सायंदैनिक
प्राजक्त



श्रीपरशुराम



श्रीकोळेश्वर



श्रीयोगेश्वरी

भावे मित्र मंडळाचे द्वै मासिक

‘भावे-प्रयोग’

भावे मित्र मंडळ
एक परिवार

भावे मित्र मंडळाचे द्वैमासिक जुलै २०२४

# कौशिक गोत्री, चित्पावन भावे कुलाचा कुलवृत्तांत

भावे मित्र मंडळ स्थापन होऊन नंतर २००६ मध्ये भावे मित्र मंडळाची नोंदणी झाली. भावे मित्र मंडळाचे द्वैमासिक प्रकाशित होऊ लागले. भावे मंडळींचे अनेक पत्ते मंडळाकडे उपलब्ध झाले. ह्या द्वैमासिकातून छोट्याशा चौकटीतून कुलवृत्तांतासंबंधात काम करता येईल का, अशी विचारणा सतत होत असे. प्रत्यक्षात काहीच घडत नव्हतं. मार्च २०20 मध्ये कोरोनामुळे लॉकडाऊन आलं. त्यावेळेला मी असा विचार केला की १९९१ सालचा कुलवृत्तांत जर पुन्हा जसाच्या तसा टाईप करून ठेवला तर नंतर त्यामध्ये नवीन आलेली माहिती आपल्याला घेता येईल. माझा पूर्वी प्रकाशनाचा व्यवसाय असल्याने व दर दोन महिन्याने प्रकाशित होणारे आपले नियतकालिकाचे काम मी माझ्याकडेच करीत असल्याने कुलवृत्तांतासाठी काय करावे लागेल याची मला कल्पना आली व मी कुलवृत्तांताचे काम हळूहळु सुरू केले. हे काम पूर्ण झाल्यानंतर २००४ साली विजयराव भावे यांच्या सहीने पत्र व फॉर्म पाठवून ते कुलवृत्तांताच्या पुरवणीसाठी म्हणून भरून घेतले होते, तसेच पर्शराम भावे जेव्हा जेव्हा भावे मंडळींची भेट घेत असत तेव्हाही ते फॉर्म भरून घेत असत, ती माहितीही मी कुलवृत्तांतात घेतली. त्यामुळे आत्ता कुलवृत्तांताच्या माहितीचा ६० ते ७० टक्के भाग पूर्ण झाला आहे. आता नवीन माहिती येणे आवश्यक आहे. त्यासाठी एक फार्म तयार केला आहे. तो फॉर्म पान क्रमांक ३ वर छापला आहे. नमुना फॉर्मस् पान क्र ४ वर दिलेले आहेत. हे नमुना फॉर्मस् स्वतंत्रपणे तयार केलेले आहेत, तशा नोंदी कुलवृत्तांत सापडणार नाहीत. - अभय भावे.

## भावे कुलवृत्तांताचा फॉर्म भरताना लक्षात घ्यावयाचे मुद्दे ..

**१) प्राजक्तच्या या अंकात दिलेला फॉर्म सर्वांनी भरून पाठवायचा आहे. २) सर्वप्रथम कुलवृत्तांतातील आपल्या घराण्याच्या नोंदी पहाव्यात. कुलवृत्तांतात नाव सापडत नसेल तर आपल्या वडिलांचे, आजोबांचे व पणजोबांचे पूर्ण नाव अभय भावे यांना कळवलेत तर ते कुलवृत्तांतातील त्या पानाचा फोटो पाठवतील. ३) आपल्या घरातील कोणत्या व्यक्तीपर्यंतची माहिती आली आहे, ते पहावे. ज्या सदस्यांबद्दल ‘माहिती उपलब्ध नाही’ असे लिहिले आहे, त्यांचीही माहिती वेगळ्या फॉर्ममध्ये लिहून पाठवायची आहे. ४) १९९१ साली कुलवृत्तांत छापल्यानंतर आपल्या घरात झालेली लग्नं, नवीन जन्मलेले सदस्य, अगदी तान्ह्या मुलांची सुद्धा माहिती, तसेच घरातील सदस्यांचे झालेले मृत्यू, यांची माहिती भरायची आहे. १९९१ सालानंतर आपल्या आयुष्यातले बदल जसे नोकरी, रिटायरमेंट याबद्दलही माहिती लिहायची आहे. ५) घरातल्या प्रत्येक व्यक्तीचा वेगळा फॉर्म भरायचा आहे. कारण त्यात प्रत्येकाची जन्मतारीख, शिक्षण, प्रत्येकाचा व्यवसाय नोकरी याची वेगळी वेगळी माहिती भरायची आहे. त्यासाठी प्राजक्तमध्ये आलेल्या फॉर्मच्या, सदस्य संख्येप्रमाणे झेरॉक्स काढाव्यात. ६) आपल्या मुलींची लग्ने झाली असल्यास त्यांचं आधीचं नाव, आत्ताचं नाव, शिक्षण, नोकरी आणि लग्नानंतरचा तिचा पत्ता, याबद्दलची माहिती वेगळ्या फॉर्मवर द्यायची आहे. ७) आईवडील हयात नसल्यास बहिणींची किंवा आत्यांची माहिती भावांनी वेगवेगळ्या फॉर्ममध्ये लिहून पाठवावी किंवा त्यांना फॉर्म भरायला सांगावे. ८) भावे घराण्यातील स्त्रियांनी/म्हणजे सासू आणि सुनांनी, फॉर्म भरताना, घराणे लिहावे, कुलवृत्तांतातील पान क्रमांक लिहावा. त्यानंतर पणजोबांचे, आजोबांचे नाव आणि व्यक्तीचे नाव, इथे काहीच लिहायचे नाही. ‘पत्नीचे नाव’ पासून त्यांनी आपली माहिती लिहावी. त्यात, स्वत:च्या नावानंतर माहेरचे पूर्ण नाव लिहावे व पुढील माहिती भरावी. ९) हयात नसलेल्यांच्या मृत्युचे दिनांकही द्यायचे आहेत. आपापले फॉर्म भरून झाल्यानंतर, आपल्या नातेवाईकांना, तसेच आपल्या जवळपास रहाणाऱ्या भाव्यांनाही याची माहिती द्यावी आणि लवकरात लवकर फॉर्म भरून पाठवण्यास उद्युक्त करावे.**

**यासंदर्भात कुठलीही शंका असल्यास श्री. अभय भावे ९४२२३०६०३३ यांच्याशी संपर्क करावा. Word file मध्ये फॉर्म पाठवायचे असतील तर bhave1956@gmail.com या ईमेल वर पाठवावेत. फॉर्म पोस्टाने पाठवायचे असल्यास खालील पत्त्यावर पाठवावेत. भावे मित्र मंडळ, द्वारा एल.डी.भावे अँड सन्स, १२४४, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४.**

भावे मित्र मंडळाची कार्यकारिणी हीच कुलवृत्तांतासाठीची समिती असणार आहे. त्यांची नावे व फोन नंबर्स खाली देत आहे. कार्यकारिणीच्या या सदस्यांकडे कुलवृत्तांताचा फॉर्म भरून दिला तरी तो कुलवृत्तांताचे काम करणाऱ्यांकडे पोहोचेल.

**मोबाईल नंबर**

१) श्रीवर्धन वामन भावे, पुणे. अध्यक्ष, भावे मित्र मंडळ ......... ९६७३९९९८४८
२) जयंत गंगाधर भावे, दापोली उपाध्यक्ष, भावे मित्र मंडळ .... ८८०६०५३४३४
३) सौ.ज्योती अभय भावे, पुणे. सचिव, भावे मित्र मंडळ ....... ९४२२३०६०३२
४) विनय अरुण भावे, पुणे. खजिनदार, भावे मित्र मंडळ ........ ९४२३२१३६६०
५) अभय शंकर भावे, पुणे. .......................................... ९४२२३०६०३३
६) उदय नारायण भावे, पुणे. ....................................... ९४२०४९५५४०
७) आशीष रमेश भावे, पुणे. ........................................ ८८६२०७९२९२
८) नीलेश पांडुरंग भावे, पुणे. ...................................... ९८२२०९३६१४
९) डॉ. विश्वनाथ (वल्लभ) श्रीपाद भावे, गोवा. .................... ९७६५२७२७५८
१०) वंदना हेमंत भावे, नागपूर. ..................................... ९४२२८०५२६८
११) श्रीकांत शरद भावे, नागपूर. .................................. ९४२३६३६११३
१२) सौ. संज्योती संजय भावे, भोपाळ. ........................... ९४२३५९३०३३
१३) कृष्ण वैजनाथ भावे, बडोदा. ................................. ९४२६३३५५८८
१४) विश्वजीत अरुण भावे, छ.संभाजीनगर(औरंगाबाद.)....... ९८५००१९१०९
१५) सुरेश माधव भावे, पुणे. ........................................ ९४२२३२०२३३
१६) प्रकाश चिंतामण भावे, पुणे. .................................. ९८२०५५६५८५
१७) विश्वनाथ (अजित) राजाराम भावे, पनवेल. ................ ९८२१६९३१०८
१८) सौ. सरिता राजेंद्र भावे, मुंबई. ............................... ९८३३९४६५२९
१९) सौ. शर्मिला चंद्रशेखर भावे, पुणे. ........................... ९८२२०३९८८९
२०) अमित विठ्ठल भावे, डोंबिवली. .............................. ९८९२४६७२४४
२१) पर्शराम गोविंद भावे, पुणे. .................................... ९४०३५१६८७५

# संपादकीय

आमची माहिती मागच्या कुलवृत्तांतात आहे. आता पुन्हा फॉर्म कशाला भरून हवेत? असे प्रश्न विचारले जातात. १९९१ सालच्या नंतर त्या माहितीत अनेक बदल झाले असणारच ना? म्हणून नव्याने फॉर्म भरणे आवश्यक आहे.

अद्याप अनेक भावे कुटुंबियांचे कुलवृत्तांताचे फॉर्म येणे शिल्लक आहे. कुलवृत्तांताचे फॉर्म भरून द्या अशी विनंती केल्यावर काहीजण कधीपर्यंत फॉर्म भरून दिले तर चालतील असे विचारतात. याला मुदत नसली तरी हे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी फॉर्म तात्काळ भरावेत. आपले घराणे कोणते? कुलवृत्तांतात नाव आहे की नाही याचा विचार न करता फॉर्म भरून पाठवावेत, घराणे शोधण्याचे काम कुलवृत्तांताचे काम करणारे करतीलच. भावे कुलवृत्तांताचे फॉर्म भरून पाठवण्यासाठी तासाभराचाच अवधी लागतो, त्यामुळे वेळ काढून कुलवृत्तांताचे फॉर्म भरून पाठवावेत. सर्वांनी लवकरात लवकर आपली माहिती भरून पाठवावी म्हणजे कुलवृत्तांताच्या कामाला गती मिळेल. सर्वांनी आपले फॉर्म भरताना आपल्या मागील पिढीचेही अपडेटस भरून पाठवावेत. तसेच प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्र फॉर्म भरावा म्हणजे कुलवृत्तांतात सर्व माहिती समाविष्ट होईल. कुलवृत्तांताचा फॉर्म भरण्यासंबंधीची अधिक माहिती पान क्र १ वर व भरून द्यायचा फॉर्म पान क्र ३ वर आहे. नमुन्याचे फॉर्म पान क्र ४ वर छापले आहेत.

Unsung Heros गाऊ त्यांना आरती! अनेक अलौकिक, दुर्मिळ गुणवत्ता असलेल्या भावे कुलातील व्यक्ती केवळ प्रसिद्धीचे कोंदण न लाभल्यामुळे विस्मृतीत गेल्या. अशा व्यक्तिमत्त्वांचा परिचय करून देणारे हे सदर आहे. या लेखमालिकेतून भावे कुलात आपल्या कार्यकर्तृत्वाने विविध क्षेत्रात ज्यांनी आपला ठसा उमटवला अशा व्यक्तींची माहिती देण्याच्या या उपक्रमाला वाचकांची पसंती असल्याचे त्यांच्या येणाऱ्या प्रतिक्रियांमुळे लक्षात येते आहे. अशा व्यक्तींची माहिती आम्हास लिहून पाठवावी, म्हणजे ती पुढील अंकांमधून प्रकाशित करता येईल व कुलवृत्तांतातही समाविष्ट करता येईल.

'उद्योजक म्हणून घडताना' ही भाव्यांमधील व्यावसायिकांनी आपण व्यवसाय का करू लागलो, त्या मागची प्रेरणा कोणाची, व्यवसाय करताना अडचणी काय आल्या अशा अनुभव कथनाची ही लेखमाला आहे. आपले व्यावसायिक अनुभव मराठी, इंग्रजी, हिंदी या कोणत्याही भाषेतून साधारण १००० ते १२०० शब्दांत लिहून bhave1956@gmail.com या मेलवर पाठवावेत. व्यवसायात नव्याने येणाऱ्या भावी पिढीसाठी हे अनुभव निश्चित मार्गदर्शक ठरतील. अनेकांना लिखाणाची सवय नसते अशांनी ऑडियो रेकॉर्डिंग करून ते पाठविल्यास त्यावरूनही लेख तयार करून घेता येईल.

'भावे-प्रयोग'या प्राजक्ततर्फे प्रकाशित होणाऱ्या अंकात आपला सहभाग लिखाणाच्या रूपाने हवा आहे. आपल्यात सिद्धहस्त लेखक आणि कवी आहेत, त्यांचेही साहित्य प्रकाशित करायची संधी मिळावी असे आवाहन याद्वारे मी करीत आहे. अनेकांना मी भेटत असतो, त्यावेळी त्यांना तुम्ही तुमच्या पद्धतीने लिहून द्या, त्यावर संपादकीय संस्कार करून, लिखाण व्यवस्थित करून घेईन असे मी सांगत असतो. त्यामुळे आपल्याला सुचलेल्या विषयावरील लिखाण जरूर पाठवावे, ही विनंती.

**अभय शंकर भावे**
९४२२३०६०३३ Whats App / ७०२०६४५८९२

## अंकाबद्दल प्रतिक्रिया

भावे मित्र मंडळातर्फे निघणाऱ्या, प्राजक्त, या मे २०२४ च्या द्वैमासिकात माझा छोटा लेख आला. खूप छान वाटले. घरच्यांनी कौतुक केल्याची भावना आली. श्री. अभय भावे व इतर संपादकीय मंडळ सातत्याने भावे मित्र मंडळाचे हे द्वैमासिक ना नफा ना तोटा या तत्त्वावर बरेच वर्ष चालवीत आहेत. खूप माहितीपूर्ण लेख यामुळे वाचता येतात. भावे कुटुंबीयांचे विशेष कर्तृत्व, प्रगती याची माहिती मिळते. याबद्दल या सर्वांचे कष्ट कौतुकास्पदच आहेत. पुढील वाटचालीस शुभेच्छा.

**प्रसाद रामकृष्ण भावे, पुणे.**

---

नमस्कार, मे २०२४ प्राजक्तचा अंक मिळाला. श्री. प्रसाद रामकृष्ण भावे यांचा 'माझे गाणे' आणि श्रीमती वंदना भावे यांचा 'प्रवासा आधीचा अविस्मरणीय प्रवास' हे लेख खूप मनोरंजक होते. 'गाऊ त्यांना आरती' सदरातील कै. डॉ. काशिनाथ भावे यांचे विषयीचा डॉ. उदय काशीनाथ भावे यांनी लिहिलेला जीवन परिचय अतिशय प्रेरणादायी होता. तसेच सावरकरवादी पत्रकार ग. वि. केतकर यांच्या बद्दलची माहिती उल्लेखनीय होती. एकूणच अंकाचा दर्जा उत्कृष्ट होता. आपले खूप आभार.

**डॉ. सरिता विनय भावे, मुंबई.**

## साभार कृतज्ञता

**१) सुहास केशव भावे, मुंबई. यांनी स्वनिधीसाठी रु. पाच हजार रुपयांची देणगी दिली आहे. २) भावे शिक्षण निधीस राजेश शशीकांत भावे, मुंबई यांनी शशीकांत भावे व सुजाता भावे यांचे स्मरणार्थ वीस हजार रुपयांची देणगी दिली आहे. ३) संजय केशव भावे, ठाणे यांनी भावे कुलवृत्तांतासाठी रु. पाच हजार रुपयांची देणगी दिली आहे.**

**भावे मित्र मंडळ सर्वांचे अतिशय आभारी आहे.**

**कुलवृत्तांताच्या पीडीएफ : पहिला भावे कुलवृत्तांत सन १९४० व दुसरा सन १९९१ मध्ये प्रसिध्द झाला. १९९१ च्या कुलवृत्तांताच्या प्रती शिल्लक नाहीत. दोन्ही कुलवृत्तांताच्या दोन स्वतंत्र पीडीएफ तयार आहेत. त्या पीडएफ आता सर्वांना उपलब्ध करून देण्यात येतील, त्यासाठी अभय शंकर भावे यांना ९४२२३०६०३३ या क्रमांकावर किंवा** bhave1956@gmail.com **या मेलवर संपूर्ण नाव, व पत्ता व ईमेल ॲड्रेस सह कळवावे म्हणजे पीडीएफ मेलने पाठविता येतील.**

पोस्टाने अंक न मिळण्याचे प्रमाण भरपूर आहे. अंक ई मेलने पाठविण्याचा प्रयोग चांगलाच यशस्वी ठरतो आहे. असाही एक सूर ऐकू आला की व्हॉटस् ॲपवर अंक पाठवा, पण ते शक्य नाहीये हे लक्षात घेऊनच ई-मेलचा मार्ग निवडला आहे. कुटुंबातील सर्वांचे मेल ॲड्रेस पाठवावेत. अजूनही अनेकांचे मेल ॲड्रेस उपलब्ध झालेले नाहीत, तरी आपले मेल ॲड्रेस bhave1956@gmail.com या मेलवर कळवावेत म्हणजे पुढील अंक मेलनेही पाठवता येतील. मेल करताना आपल्या संपूर्ण नावासह पूर्ण पत्ता व फोन नंबरही कळवावा.

# कौशिक गोत्री, चित्पावन, भावे कुलाच्या कुलवृत्तांतासाठी फॉर्म

**हा फॉर्म कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने किंवा प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्रपणे भरायचा आहे.**
**विवाहित स्त्रियांनी फॉर्म भरताना आपल्या पूर्ण नावासह पूर्वीचेही नाव लिहावे.**

कुलवृत्तांताप्रमाणे घराणे : .............................. कुलवृत्तांतातील पान क्रमांक .......................
(घराणे व पान क्रमांक माहिती नसल्यास किंवा सापडला नाही तर तसे लिहावे.)
मूळगाव : ...................
पणजोबांचे संपूर्ण नाव : .............................. आजोबांचे संपूर्ण नाव : ............................
वडिलांचे संपूर्ण नाव : ..........................................................................
व्यक्तीचे संपूर्ण नाव : ..........................................................................
पत्नीचे संपूर्ण नाव : ............................................................................
मुलगे व मुलींची संपूर्ण नावे : ...................................................................
...........................................................................................
पत्ता : ....................................................................................
...........................................................................................
शहर/गाव ............................ पिन कोड क्र. ............................
जन्म दिनांक .......................... शिक्षण : ...............................................
फोन नं. एस.टी.डी कोड सहित. ...................... मोबाईल नं. : ....................................
व्हॉटस्ॲप नं. :.............................. ई-मेल : ..............................................
नोकरी/व्यवसायाबद्दल व आपल्या आयुष्यातील विविध प्रगतीविषयी माहिती द्यावी.
...........................................................................................
...........................................................................................
...........................................................................................
...........................................................................................
...........................................................................................
...........................................................................................
...........................................................................................
...........................................................................................
...........................................................................................
...........................................................................................
...........................................................................................
...........................................................................................
...........................................................................................
...........................................................................................
...........................................................................................
...........................................................................................
...........................................................................................

स्वाक्षरी

## कौशिक गोत्री, चित्पावन, भावे कुलाच्या कुलवृत्तांतासाठी फॉर्म

हा फॉर्म कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने किंवा प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्रपणे भरायचा आहे.

कुलवृत्तांताप्रमाणे घराणे : धाकुलभट शाखा सोनी कुलवृत्तांतातील पान क्रमांक ५६
(घराणे व पान क्रमांक माहिती नसल्यास किंवा सापडला नाही तर तसे लिहावे.)
मूळगाव : माहिती नाही
पणजोबांचे संपूर्ण नाव : नारायण नरहर आजोबांचे संपूर्ण नाव : पुरुषोत्तम नारायण
व्यक्तीचे संपूर्ण नाव : विश्वंभर पुरुषोत्तम भावे
पत्नीचे संपूर्ण नाव : ज्योत्स्ना विश्वंभर भावे
मुलगे व मुलींची संपूर्ण नावे : चेतन विश्वंभर भावे, विवेक विश्वंभर भावे
राधिका विश्वंभर भावे (राधिका शंतनू जोशी, पुणे)
पत्ता : ४०४, शनिवार पेठ, सातारा
शहर/गाव सातारा पिन कोड क्र. ४१५००२
जन्म दिनांक २६-१२-१९४० शिक्षण : मॅट्रिक, डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनियरिंग
फोन नं. एस.टी.डी कोड सहित. — मोबाईल नं. : X XXXXXXXXXX
व्हॉटस्‌अॅप नं. : Same ई-मेल : vp-bhave@----.com
नोकरी/व्यवसायाबद्दल व आपल्या आयुष्यातील विविध प्रगतीविषयी माहिती द्यावी.

आर्थिक परिस्थितीशी झगडत शिक्षण घेतले. उच्च शिक्षण घेण्याची परिस्थिती नसल्याने नोकरी करत डिप्लोमाचे शिक्षण पूर्ण केले. मुंबईला ---- इलेक्ट्रीकल लि. येथे नोकरी केली. कंपनीच्या उत्पादनात गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले. निवृत्तीनंतर ज्योतिषाचा अभ्यास करून ज्योतिष विशारद व ज्योतिष पंडित झाले. या संदर्भात त्यांनी अनेकांना मार्गदर्शनही केले. वयाच्या ७८ व्या वर्षी २०१८ साली अल्पशा आजाराने की निधन झाले.

स्वाक्षरी

## कौशिक गोत्री, चित्पावन, भावे कुलाच्या कुलवृत्तांतासाठी फॉर्म

हा फॉर्म कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने किंवा प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्रपणे भरायचा आहे.

कुलवृत्तांताप्रमाणे घराणे : धाकुलभट शाखा सोनी कुलवृत्तांतातील पान क्रमांक ५६
(घराणे व पान क्रमांक माहिती नसल्यास किंवा सापडला नाही तर तसे लिहावे.)
मूळगाव : माहिती नाही
पणजोबांचे संपूर्ण नाव : आजोबांचे संपूर्ण नाव :
व्यक्तीचे संपूर्ण नाव : ज्योत्स्ना विश्वंभर भावे (सुलभा अनंत पळणीटकर, मोर.)
पत्नीचे संपूर्ण नाव :
मुलगे व मुलींची संपूर्ण नावे :
पत्ता : ४०४, शनिवार पेठ, सातारा
शहर/गाव सातारा पिन कोड क्र. ४१५००२
जन्म दिनांक २२-८-१९४५ शिक्षण : मॅट्रिक
फोन नं. एस.टी.डी कोड सहित. — मोबाईल नं. : XXXXXXXXXXX
व्हॉटस्‌अॅप नं. : Same ई-मेल : —
नोकरी/व्यवसायाबद्दल व आपल्या आयुष्यातील विविध प्रगतीविषयी माहिती द्यावी.

लग्नानंतर खाजगी शिकवण्या घेऊन पतीस हातभार लावला. शिवणकाम, भरतकाम करीत असत.

स्वाक्षरी

## कौशिक गोत्री, चित्पावन, भावे कुलाच्या कुलवृत्तांतासाठी फॉर्म

हा फॉर्म कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने किंवा प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्रपणे भरायचा आहे.

कुलवृत्तांताप्रमाणे घराणे : धाकुलभट शाखा सोनी कुलवृत्तांतातील पान क्रमांक ५६
(घराणे व पान क्रमांक माहिती नसल्यास किंवा सापडला नाही तर तसे लिहावे.)
मूळगाव : माहिती नाही
पणजोबांचे संपूर्ण नाव : आजोबांचे संपूर्ण नाव :
व्यक्तीचे संपूर्ण नाव : चेतन विश्वंभर भावे
पत्नीचे संपूर्ण नाव :
मुलगे व मुलींची संपूर्ण नावे :
पत्ता : १२६०, सदाशिव पेठ, ओंकार अपार्टमेंट फ्लॅट नं २५.
शहर/गाव पुणे पिन कोड क्र. ४११०३०
जन्म दिनांक २१-१०-१९६६ शिक्षण : बी.कॉम, एल.एल.बी.
फोन नं. एस.टी.डी कोड सहित. मोबाईल नं. : XXXXXXXXXXXX
व्हॉटस्‌अॅप नं. : XXXXXXXXXX ई-मेल : cvb68@----.com
नोकरी/व्यवसायाबद्दल व आपल्या आयुष्यातील विविध प्रगतीविषयी माहिती द्यावी.

मुंबईत असताना बी.कॉम चे शिक्षण झाल्यावर एल.एल.बी साठी पुण्यात लॉ कॉलेजमध्ये अ‍ॅडमिशन घेऊन लॉ पूर्ण केले. काही दिवस ज्येष्ठ वकिलांकडे अनुभव घेऊन स्वतःची प्रॅक्टिस सुरू केली.

स्वाक्षरी

## कौशिक गोत्री, चित्पावन, भावे कुलाच्या कुलवृत्तांतासाठी फॉर्म

हा फॉर्म कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने किंवा प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्रपणे भरायचा आहे.

कुलवृत्तांताप्रमाणे घराणे : धाकुलभट शाखा सोनी कुलवृत्तांतातील पान क्रमांक ५६
(घराणे व पान क्रमांक माहिती नसल्यास किंवा सापडला नाही तर तसे लिहावे.)
मूळगाव : माहिती नाही
पणजोबांचे संपूर्ण नाव : आजोबांचे संपूर्ण नाव :
व्यक्तीचे संपूर्ण नाव :
पत्नीचे संपूर्ण नाव :
मुलगे व मुलींची संपूर्ण नावे : राधिका शंतनु जोशी, पुणे
(राधिका विश्वंभर भावे)
पत्ता : ५०८, नवसह्याद्री सोसायटी, कर्वेनगर पुणे
शहर/गाव पुणे पिन कोड क्र. ४११०५२
जन्म दिनांक ४-४-१९६० शिक्षण : बी.कॉम
फोन नं. एस.टी.डी कोड सहित. मोबाईल नं. : XXXXXXXXXXX
व्हॉटस्‌अॅप नं. : XXXXXXXXXXX ई-मेल : radhikabhave@----.com
नोकरी/व्यवसायाबद्दल व आपल्या आयुष्यातील विविध प्रगतीविषयी माहिती द्यावी.

बी.कॉम करत असताना नृत्याचे क्लास लावले होते शिक्षण पूर्ण झाल्यावर बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये नोकरी केली. लग्नानंतर नोकरी सुरु आहे.

स्वाक्षरी

## Unsung Heros
## गाऊ त्यांना आरती!

© सौ. सुलक्षणा दिलीप लिमये, डोंबिवली.

**कळंबुशी घराण्यातील आयुर्वेदाचार्य कै. डॉ. श्रीकृष्ण श्रीराम भावे.**

श्रीकृष्ण श्रीराम भावे यांचा जन्म दि १४-०८-१९२० ला झाला.

कधी कधी एक मोठे चक्रीवादळ येते व एखाद्या ठिकाणाला उध्वस्त करून जाते तसेच काहीसे झाले. नानांच्या वडिलांच्या (माझे आजोबा) रागाच्या वादळामुळे माझ्या वडिलांना वयाच्या तेराव्या वर्षी घर सोडून जावे लागले.

माझ्या वडिलांना पाच बहिणी व दोन भाऊ होते. त्यांचे वडील कै. श्रीराम सीताराम भावे हे मुंबई महापालिकेच्या शाळेमध्ये हेडमास्तर होते. शाळेत व घरी ही कडक शिस्त. वडिलांना लहानपणी सर्वजण नाना म्हणत. सर्व काही घड्याळ्याच्या काट्यावर चाले. लहानपणी नानांचे अभ्यासाच्या वेळेकडे दुर्लक्ष झाले व ते उशिरा घरात आले. २/३ वेळा असे झाले, तेव्हा तुझ्या या वागण्यामुळे तुझी लहान भावंडे अभ्यास करणार नाहीत व चुकीचे वळण लागून बिघडतील म्हणून तू ताबडतोब घर सोडून जा असे त्यांना वडिलांनी फर्मावले. त्यांच्या रागापुढे कोणाचेच चालत नसे. नानांच्या आईने म्हणजे आमच्या आजीने, (कै. यशोदा) त्यांना एक रुपया देऊन मुंबईच्या व्हिक्टोरिया स्टेशनवर सोडले व म्हणाली नागपूरला मामांकडे इतवारीत जा. त्याचे हॉटेल आहे व त्याच्याकडे रहा असे सांगून गाडीत बसवले. इतक्या लहान वयात एवढा लांब प्रवास करून नाना नागपूरला पोहोचले.



मामांचे चहा, भजी, नाश्ता देणारे छोटेसे हॉटेल होते तेथे ते काम करत. घरी मामींकडे पाणी भरणे, धान्य निवडणे इत्यादी सर्व कामे ते करत. तिथे ते शाळेतही जाऊ लागले. त्याचवेळी संघाच्या शाखा सुरू झाल्या होत्या, तिथे ते जात. तिथेच त्यांना पाटणकर, शनिवारे, प्रकाशे, देशपांडे यांचासारखा उत्तम मित्रपरिवार लाभला. मॅट्रिक झाल्याझाल्याच रा.स्व.संघाने त्यांना पूर्णवेळ प्रचारक म्हणून बिहार येथे पाठवले. बिहारमध्ये संघ शाखा स्थापन करणे त्याची व्यवस्था लावून पुढील गावात जाणे असे त्यांचे चालू होते. चंपारण, दरभंगा, सीतामढी, बेतिया इत्यादी ठिकाणी त्यांनी संघ शाखा प्रस्थापित केल्या. अत्यंत प्रतिकूल व खडतर असा त्यांचा हा कालखंड होता. कोणी बोलावले तरच ते एखाद्याच्या घरी जेवायला जात. अपना हात जगन्नाथ... कधी कधी भांडंभर पाण्यात तिखट, मीठ घालून पीत असत. तोडलेले ऊस चघळत असत. पण त्यावेळेसही कधी त्यांनी कोणाकडे हात पसरले नाहीत.

मला कातळावरही टाकले तरी तिथे मी रुजेन असा त्यांचा मनोनिग्रह असे व तो कायम होता. संघाच्या नागपूरला होणाऱ्या ओटीसी कॅम्पमध्ये ते वेत्र चर्म युद्धअभ्यास शिकवत. वेत्र म्हणजे वेताची छडी आणि चर्म म्हणजे छोटीशी ढाल. वेत्राने एकमेकांना तडाखे द्यायचे आणि ते ढालीवर झेलायचे. काटक व लवचिक देहयष्टी, गोरा रंग, कोकणस्थी घारी छटा असलेले भेदक डोळे. वेत्र चर्म या लढाऊ खेळाच्या प्रकारात त्यांचा हात धरणारा कोणी नव्हता. शिकता शिकवता अनेकदा ते रक्तबंबाळ ही होत.

बिहारमध्ये त्यांचा परिचय निसर्गोपचारक डॉक्टर हुंडेकर यांच्याशी झाला. त्यांच्याकडे राहून ते निसर्गोपचार शिकले व करूही लागले. अनेक पोलिओग्रस्त तसेच पक्षाघात झालेल्या रुग्णांवर या काळात त्यांनी उपचार केले. स्वातंत्र्योत्तर गांधीवधाच्या पार्श्वभूमीत पहिल्या संघ बंदीमध्ये त्यांना अटक झाली व ते आठ महिने कारावासात होते. कारावासातच हिंदू समाजाला आपण एकत्रित कसे करू शकतो याचे त्यांच्या मनात आराखडे तयार होते. हिंदूंची एकजूट करायची असेल तर केवळ संघाची शाखा उघडून उपयोग नाही, तर संघ संचालित शाळा, संघ संचालित दवाखाने व संघ संचालित समाज मंदिरांची इत्यादी समाजाच्या उपयोगी पडण्यासाठी भक्कम पायाभरणी झाल्यास संघाला कोणीच कधीही हलवू शकणार नाही असं त्यांनी त्या काळातल्या संघातील श्रेष्ठींना कळकळून सांगितले. परंतु संघ म्हणजे शाखा, संघ म्हणजे दक्ष-आरम, .... शाखा म्हणजेच संघ. केवळ शाखांमुळेच हिंदूंची एकजूट होईल असे तत्कालीन संघातील श्रेष्ठींना वाटत असे. भावेजी तुम्हाला संघ समजलेला दिसत नाही, असे तप्त लोहरसाचे वाक्य कानात पडताच त्यांनी संघाला कायमचा नमस्कार केला.

आपली ऐन उमेदीची अठरा वर्ष त्यांनी या संघटनेला दिली होती. गांधीवधा पश्चात अनेक ब्राह्मणांचा बळी गेला. ब्राह्मण विद्वेषाचा गदारोळ, त्यामध्ये ते परत मुंबईला वडिलांकडे गेले. पण वडिलांनी घरी राहायची अनुज्ञा दिली नाही. कारावासातून मुंबईस परत आले. घरी प्रवेश नाकारल्याने ते कधी बंद दुकानाच्या फळीवर तर कधी चौपाटीच्या रेतीमध्ये ते झोपत. हळूहळू त्यांनी बिहारमध्ये शिकलेल्या निसर्गोपचाराचा वापर करून त्यांनी रुग्णांना बरे करायला सुरुवात केली. गिरगावच्या निकदवरी लेनमधील दूधवाला बिल्डिंगमधील जिन्याखालची खोली त्यांनी भाड्याने घेतली. आठ बाय चारचा निमुळता पट्टा आणि त्यातच चार फुटी पोटमाळा अशा चिमुकल्या घरात ते राहू लागले, अगदी दोन मुलींचा जन्म होईस्तोवर...

१९५१ साली त्यांचे लग्न वैद्यांच्या घरातील सुलभा हिच्या बरोबर झाले. वयाचे ३५ वे वर्ष उलटून गेल्यावर त्यांनी पुनर्वसू महाविद्यालयात आयुर्वेद शिक्षणासाठी प्रवेश घेतला व आयुर्वेद प्रवीण ही पदविका उत्तम गुणांनी मिळवली.

सकाळी पेशंटच्या ट्रीटमेंटला जाता जाता अष्टांग हृदयाच्या तिन्ही संहिता त्यांनी मुखोद्गत केल्या होत्या. ज्या संस्थेने शिकवले त्याची कृतज्ञता म्हणून फक्त एक रुपया मानधनावर त्याच संस्थेमध्ये अध्यापन करून पंचकर्म या विभागाचे ते विभाग प्रमुख या पदावरुन निवृत्त झाले. अत्यंत स्वाभिमानी तेवढेच कनवाळू, अभ्यासू व तेवढेच कल्पक. ज्ञानसाधनेसाठी अत्यंत कष्ट घेण्याची त्यांची वृत्ती होती. ते उत्तम शिवणकाम करत. त्यांच्या मुलांची दप्तरे रेगझिन कातड्याची मशीनवर उत्तम प्रकारे शिवत असत. चर्मकाराची सर्व साधने आमच्या घरी होती व टायरच्या इनरसोलपासून ते स्वत:साठी चप्पलही बनवत. प्लंबिंग सुतारकाम बगीच्याच्या कामासाठी लागणारी सर्व हत्यारे घरात होती.

हार्मोनियम ते उत्तम वाजवत. नाना उत्तम पेटी वाजवत व आई गात असे. ते शीघ्र कवी होते. आयुर्वेदावर, त्यांच्या मुलांवर, वैद्यकीय पद्धतीवर, अत्यंत सुंदर हस्ताक्षरात त्यांनी अनेक कविता लिहून ठेवलेल्या आहेत.

मित्रांविषयी अपार कणव त्यांच्याजवळ होती. घरी आलेल्या कोणालाही ओळखीचा असो वा नसो ते जेवल्याशिवाय सोडत नसत.

त्यांचे विद्यार्थी, पेशंट, बिहारकडचे त्यांचे मित्र व त्यांचे परिवार अशांना आमचं घर हे स्वत:चं घर होतं. अनेकानेक लोकांना आमच्या आईने प्रेमाने रांधून जेवायला घालून मार्गस्थ केले आहे.

त्यांच्या मोठ्या बहिणीला कॅन्सरचे निदान झाल्यावर बॉम्बे हॉस्पिटलमध्ये आता सहाच महिने जीवन राहिले आहे असे सांगण्यात आले. माझ्या आत्याला आयुर्वेदिक उपचार देऊन माझे काका व माझ्या वडिलांनी संपूर्णपणे कॅन्सर मुक्त केले. ती पुढे २५ वर्ष जगली.

अनेक पोलिओग्रस्त मुलांना तसेच मणक्याच्या विकारांनी त्रस्त पेशंटसना त्यांनी रोगमुक्त केले आहे. उदररोग झालेल्या अनेक पेशंटसना त्यांच्यामुळे जीवनदान लाभले आहे.

अत्यंत कनवाळू असल्याने आणि आपल्या उमेदीच्या काळातील आपले दिवस आठवून पैशाने दुर्बळ असणाऱ्यांविषयी त्यांचा कनवाळूपणा खूपच मोठा होता. एकदा कॉलेजमधली ट्रिप निर्मळ येथे गेली होती. तिथे गरीब मुले उष्ट्या पत्रावळीतून खाणे वेचून खात होती. ते पाहून ते हमसून रडू लागले. स्वत: आणलेला पिकनिकचा खाऊ या सर्व मुलांना अत्यंत प्रेमाने वाटून भरवला. कॉलेजच्या विद्यार्थ्यांना व आम्हाला सुद्धा त्यांच्या करारी व कणखर मनाची कारुण्यमय बाजू दिसून आली.

रागावले तर ज्वालामुखी सारखे विस्फोटक होते ते. न पटलेल्या गुन्हेगारांशी, मुजोरांशी त्यांनी भीषण मारामाऱ्या सुद्धा केलेल्या आहेत. दुसऱ्यांची हाडे मोडून काढलेली आहेतच, पण स्वत: सुद्धा अनेक वेळा मारामाऱ्या करत जखमी झालेले आहेत.

अनेकांना ते कुठलेही मूल्य न घेता उपचार करत औषधे देत व रोगमुक्त करत. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानून तेही कधी मंदिरात गेले नाहीत. त्यांचे निदान फारच उत्तम होते व आयुर्वेदावर त्यांची अपार श्रद्धा होती. अनेक नामांकित मंडळी त्यांची पेशंट होती. मोरारजीभाई देसाई त्यांच्या निसर्गोपचार पद्धतीवर बेहद्द खूश होते.

पोलिओ पेशंटसना बरे करण्याची त्यांची उपचारपद्धती विलक्षण होती. पोलिओग्रस्त मंडळी आपली बोटेही हलवू शकत नसत. त्यांना ते त्यांच्याकडील औषधाचा लहान लोखंडी बत्ता दाखवत असत. उपचार संपताना हा बत्ता तू तुझ्या हाताने उचलशील याची ते पेशंटला ग्वाही देत व उपचारपद्धतीअंती हे बोट न हलवणारे पेशंटही बत्ता उचलू शकत असत. एक प्रख्यात चाइल्ड स्पेशालिस्ट पांगळ्या मुलांना जिवंत मातीचे ढेकळे अशी उपमा देत असत. आमचे नाना त्याच मुलांना हलते, बोलते, धावते करत परत नॉर्मलला आणून ठेवत.

नानांनी या आपल्या विलक्षण गुणांचा बडेजाव कधीही मिरवला नाही, ना कधी पेपरमध्ये या घटनांना प्रसिद्धी दिली... पेशंटच्या सेवेचं व्रत त्यांनी आमरण स्वीकारलं आणि पूर्णत्वाला नेलं..

साठव्या वर्षी त्यांनी खरोखरीचा वानप्रस्थ स्वीकारला व वनस्पती उद्यान निर्माण करण्याचा ध्यास घेतला. त्यांच्याकडे कनवाळूपणामुळे संचित पैसा राहत नसे. वनस्पती उद्यान बांधायला मात्र त्यांनी मित्रांकडून आप्तांकडून उधारीने पैसे घेतले. उंबरगाव सारख्या कम्युनिस्ट विचारांचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी त्यांनी जागा विकत घेतली. त्यांना अत्यंत वाईट अनुभवांना सामोरे जावे लागले. रातोरात आदिवासी एक एक दोन दोन वर्ष वाढलेली झाडे मुळासकट काढून टाकत असत...

यातच त्यांनाही कर्करोगाने गाठले. कर्करोग झाला म्हणता लोकांनी ज्यांनी पैसे दिले होते ते परत मागू लागले. घेतल्या किंमतीपेक्षा कमी किंमतीला त्यांना ती जमीन विकावी लागली. घेतलेले सर्व पैसे त्यांनी सव्याज देऊन टाकले. अनेक आघाड्यांवर लढत लढत त्यांनी देह ठेवला खरा पण एक आठवण म्हणून उदाहरण.

अगदी शेवटी शेवटी त्यांना कर्करोग झाला होताच पण डोळ्यांनीही दिसेनासे झालं होतं. अशातच एक पारशी पेशंट बायकोचा आधार घेत हळूहळू आमच्या घरी आला. त्यांना कोणीतरी सांगितले की एक वैद्य अंधेरीला आहेत ते तुम्हाला काही मदत करतील का पहा.

त्याची अवस्था अत्यंत करूण होती. त्याचे सर्व आतडे त्याच्या अंगाबाहेर आले होते. आपार वेदनांनी तो कळवळून रडत होता. वडिलांनी ते निजत होते त्या जागी या पेशंटला बसवले. आम्हाला गरम पाणी आणि तेलाची बाटली आणायला सांगितली. हळूहळू त्याच्याशी विलक्षण ममत्व व मार्दवाने बोलत त्याच्या सर्व बाहेर आलेल्या भागाला तेलाने अभ्यंग स्नान घातले. चाचपडत हळूहळू सर्व अंग सुलट करत त्यांनी पोटात परत व्यवस्थित ढकलले. त्याला वेदनामुक्त केले. वेदना संपल्यावर त्याच्या चेहऱ्यावर स्मित पसरले आणि त्याच्या बायकोच्या समाधान. त्यांचा चहा पाणी नाश्ता झाला.

निघताना त्याला स्वत: वेदना झेलणाऱ्या नानांच्या कर्करोग व अंधत्वाविषयी कळले त्याच्या व त्याच्या बायकोच्या डोळ्यातून अश्रूंचा पाझर सुरू झाला आणि आमच्याही...

नागपूरमध्ये संघ शाखेत बाळासाहेब देवरसजी मुख्यशिक्षक व नाना उपमुख्यशिक्षक होते. संघामध्ये वरिष्ठ प्रचारकांच्या नावामध्ये त्यांचंही नाव अग्रणी असे होते. श्री. मोरोपंत पिंगळे, श्री. एकनाथजी रानडे, श्री. गुरुजींचे अंगरक्षक घैसासजी, गुरुजींचे स्वीय सहाय्यक श्री. भैय्याजी शहादाणी, हे त्यांचे त्या काळचे संघ प्रचारक स्नेही व अखेरपर्यंत त्यांच्यात स्नेह व एकमेकांविषयी आदरभाव होता.

संघ प्रचारात आणि सकल हिंदूंना एकत्र ठेवण्यात ते द्रष्टे होते. पूर्ण कालिक प्रचाराची अठरा वर्ष कठोर तपश्चर्या व संघाच्या मुशीत तयार झाल्याने संघ ज्या रस्त्यावर चालला त्यापेक्षा वेगळा रस्ता त्यांना अपेक्षित होता.

ज्ञान आरोग्य व सामाजिक बांधिलकी या त्रिसूत्रीमध्ये समाजाच्या प्रत्येक घटकाला बरोबर घेता येईल हे त्यांनी जाणले होते. अत्यंत कळकळीने त्यांनी संघश्रेष्ठींना हा विचार पटवण्याचा प्रयत्न केला. पण तो त्यावेळेस सपशेल धुडकावला गेला.

आजचा संघ हा ज्ञान आरोग्य व सामाजिक बांधिलकीच्या हजारो छोट्या छोट्या संस्थांनी पुढे जात आहे. नानांनी पाहिलेल्या संघाचे रूप दिसू लागताच संघाच्या व्याप्तीची, समाजभानाची आणि पर्यायाने सकल हिंदूंना घेऊन वाढण्याची रूपरेषा बदलली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बदलत्या रूपाच्या भक्कम आधारावर वाढलेल्या भाजपाने राजकारणाचे क्षितिजही वृद्धिंगत केले आहे.

संघ संचालित शाळा, दवाखाने, सामाजिक संस्था जसजशा वाढू लागल्या तसा-तसा तळागाळातील हिंदू समाज संघाबरोबर येताना दिसत आहे. पर्यायाने देशाचे नेतृत्व करत आहे व यापुढे सर्व विश्वाचा विश्वगुरू होण्याच्या तयारीत आहे.

केवळ हिंदूच नव्हे तर सर्व जनमानसाला एकत्रित घेऊन जाण्याचा व जगण्याचा त्यांचा ध्यास होता.

त्यांचे अंधेरीचे घर एकाही शब्दाचा कागदावरचा व्यवहार न करता त्यांच्या मुसलमान बिल्डर पेशंटला श्री. खत्री यांना बांधावयास दिले. त्यांच्या मृत्यू पश्चात त्यांनीच घर बांधून आईच्या व आम्हा मुलांच्या स्वाधीन केले. अंधेरीचे ख्रिस्ती धर्मगुरू फादर सोपेना त्यांच्याकडे उपचारार्थ नेहमी येत असत.

असे होते आमचे नाना.

**अशा तऱ्हेने वैद्यकीय, व सामाजिक क्षेत्रातील त्यांची कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे.**

⌘⌘⌘

**संपर्क :** इ २२, १ ला मजला, डोबिवली नागरिक को-ऑप सो.,
महात्मा फुले रोड, डोबिवली(प) ४२१२०२ **भ्रमणध्वनी :** ९८३३५८६९६०

# उद्योजक म्हणून घडताना

## भावे हायड्रोलिक्स प्रा. लिमिटेड.

© संतोष सुधीर भावे, मिरज.

### पार्श्वभूमी

माझा जन्म हैद्राबाद येथे झाला. आजोबा गजानन गणेश हे रोह्यातून मुंबई, पुणे व पुढे हैद्राबाद येथे आले. त्यांनी हैद्राबाद येथे 'निजाम विजय' या साप्ताहिकात संपादक म्हणून काम केले. निजामाच्या विरोधात लिहिले गेले म्हणून हे साप्ताहिक बंद झाले. नंतर त्यांनी पार्टनरशिपमध्ये कापडाचे दुकान सुरू केले होते व तो व्यवसाय पुढे का बंद झाला याबद्दल मला फारशी माहिती नाही. त्यांचे निधन माझ्या जन्माच्या अगोदरच झाले होते.

व्यापार, व्यवसायात आमच्या कुळात मीच पहिला नव्हतो, म्हणून थोडी पार्श्वभूमी सांगितली.

वडिलांचे शिक्षण काही काळ नागपूर व पुढे हैद्राबाद येथे झाले. आईचे शालेय शिक्षण हैद्राबाद येथे त्याकाळी ४० च्या दशकात इंग्रजी माध्यमातून झाले होते.

वडिलांनी विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नोकरी केली व १९९६ ला ते निवृत्त झाले. आई बी.ए., बी.एड. झाली होती व तिने मिरजेच्या ज्युबिली कन्या शाळेत शिक्षिका म्हणून १९७२ ते १९९६ पर्यंत नोकरी केली.

### उत्तेजन / Trigger

माझे शालेय व पुढील शिक्षण मिरज-सांगली येथे झाले. १९९० ला इंजिनिअरिंग डिप्लोमा केला.

आता सांगतो, उद्योग / व्यवसाय करण्याचे खूळ कुठून आले ते.

इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत असताना माझ्या एका मित्राने मला एक पुस्तक दिले जे भारत फोर्जचे नीलकंठराव कल्याणी यांचे आत्मचरित्र होते. ते वाचून मी इतका प्रभावित झालो होतो की मी त्यांना १९८८ साली एक आंतरदेशीय पत्र लिहून मला काय वाटले ते लिहिले व त्यांना विनंती केली की त्यांनी त्यांचा Autograph द्यावा.

काही दिवस/महिने मला नेमके आठवत नाही, पण एके दिवशी घरी पोस्टाने एक बंद पाकीट आले. उद्देशून माझे नाव होते व पाठवणारा सुद्धा त्याच नावचा! मी चक्रावून गेलो होतो!

पाकीट उघडून पहिले तर माझ्या पत्राला ते उत्तरी पत्र होते व त्यात मला शुभेच्छा दिल्या होत्या व नीलकंठराव कल्याणी परदेशी आहेत म्हणून हे ते पत्र नीलकंठरावांचे Communication सल्लागार यांनी लिहिले होते व तेही संतोष भावेच होते! ही घटना माझ्या उद्योग आयुष्यातली अतिशय महत्त्वाची होती.

### उद्योग प्रवासाची सुरुवात

माझ्या जवळपासचे किंवा नात्यातले कोणीच उद्योगात नव्हते, जे कोणी सांगेल तिथे मी जाऊन, मला काय करता येईल ते मी पहात होतो.

तेवढ्यात माझे लग्न सौ. वैशालीशी झाले. आता नोकरी करण्याशिवाय पर्याय नव्हता. पुण्यात शापूरजी पालनजी व पुढे ॲक्केरिअस टेक्नॉलॉजीजमध्ये मी नोकरी केली.

तिथे Hydraulics बरोबर माझा पहिला संबंध आला. मला Hydraulics कशाशी खातात हेही माहित नव्हते! पुढे स्पेरी विकर्स (आताची Eaton) यांचे एका ५ दिवसांचे प्रशिक्षण सत्र होते, ते पूर्ण केले. नोकरीत मन काही रमत नव्हते. माझी पत्नी BDS झाली असल्यामुळे ती एका डॉक्टरकडे प्रॅक्टीस करत होती. तोपर्यंत आमचा मुलगा शंतनू याचा जन्म झाला होता. पत्नीचे diagnosis चांगले असल्यामुळे तिने स्वत:ची प्रॅक्टीस करावी असे मी तिला सांगितले.

ही सगळी तगमग माझे वडील पहात होते. ते एके दिवशी मला म्हणाले की तुला स्वत:चे काही करायचे असल्यास नोकरी सोडून परत ये, तुम्हाला एक वर्ष सांभाळायची जबाबदारी माझी.

स्पेरी विकर्सची एजन्सी घ्यायची म्हणून पुण्याच्या त्यांच्या कंपनीत गेलो. तेव्हा मला सांगण्यात आले की आधी सर्व्हे करा. हा पहिला धडा !

नोकरी सोडून परत आलो व कोल्हापुरात एका कंपनीत फिरतीची नोकरी घेतली जेणे करून मला सर्व्हे पण करता येईल व प्रपंच पण सांभाळता येईल. सर्व्हे करत असताना असे लक्षात आले की स्पेरी विकर्सपेक्षा दुसऱ्या एका जपानी कंपनीचे जास्त प्रस्थ आहे. मग त्या कंपनीला पत्र लिहिले व एजन्सी मिळाली.

### दगड गोटे

नोकरी करत करत मी माझ्या व्यवसायाचे मार्केटिंग करत होतो.

व्यवसाय करताना सेल्स टेक्सचा नंबर काढावा लागतो हे ही मला माहित नव्हते! २३ मार्च १९९९ रोजी सुधासीत इंजिनिअर्स या नावाने व्यवसाय स्थापन झाला. पहिली ऑर्डर मिळाली पण ती पूर्ण करायला पैसे कुठे होते? एका मित्राने ते पैसे दिले व ती ऑर्डर पूर्ण केली. पुढे सांगली बँकेत CC मागण्यासाठी गेलो तेव्हा बँक मॅनेजरने गोड बोलून हाकलून लावले. माझ्यापुढे यक्ष प्रश्न होता. आता काय? वडिलांनी मला थोडे चिंतेत पाहून विचारले, 'का रे, काय झाले ?' मी सांगितले, 'मला व्यवसायासाठी पैसे कमी पडत आहेत.'

त्यांनी मला विचारले, 'तुला को-ऑपरेटीव्ह बँकेतील CC चालेल का?' मी म्हणालो, 'कुठूनही चालेल.'

त्यांचे एक स्नेही एका बँकेत स्थानिक सल्लागार म्हणून होते, त्या बँकेतून मला पहिली रु. ७५०००/- ची CC विना तारण मंजूर झाली.

याच दरम्यान पत्नीसाठी दाताच्या दवाखान्यासाठी जागा शोधत होतो. तेव्हा आपलेच कुलबंधू श्रीकांत भावे यांनी त्वरित आपली जागा भाड्याने देऊ केली. पण पुन्हा पैशाचा प्रश्न होताच. बँकेकडून कर्ज घेऊन दवाखान्यासाठीचे सर्व साहित्य घेतले व पत्नीच्या स्वत:च्या व्यवसायाची सुरुवात झाली.

इंजिनिअरिंग इंडस्ट्री हे तर खरे आमचे ग्राहक. त्या काळात Hydraulics हा विषय इंजिनिअरिंगच्या अभ्यासक्रमात नसे. त्यामुळे मलाही फारसे माहित नव्हते, अनेक कंपन्यांमध्ये अनेक अडचणी असायच्या. मी मार्केटिंगला गेलो की लोकं आपली टेक्निकल अडचण सांगत. सगळ्याच अडचणींवर माझ्याकडे तोडगा नसायचा. त्या काळात Google नव्हते! मी वेळ मागून घ्यायचो, घरी आल्यावर एखाद दोन पुस्तके जी माझ्याकडे होती, त्यातून बघून व स्वत:चा निष्कर्ष काढून पुन्हा

त्यांचेकडे जात असे व तोडगा काढून द्यायचो. हे तोडगा काढणं म्हणजे Value addition होतं हे मला माहित नव्हतं. यामुळे विश्वास संपादन करत गेलो. त्याचा परिणाम व्यापार वाढीसाठी होत गेला. व्यापार वाढावा म्हणून मी कधीही ग्राहकाच्या माथी गरज नाही ती वस्तू कधीही मारली नाही.

आपण अजूनही कुठेतरी कमी पडतोय असे सारखे वाटायचे, कारण मी व्यापार करत होतो उद्योग नव्हे!

इंडस्ट्रीमध्ये ज्या टेक्निकल अडचणी तिथला स्टाफ सांगत असे त्यातून खरं तर मी शिकत होतो. एकदा विश्वास बसला की आपल्या पुढे अनेक संधीची दारे उघडायला लागतात. त्यातूनच एक संधी आली ती एक सिस्टिम डिझाईन करण्याची व त्याचे उत्पादन करण्याची. ताबडतोब हो म्हणालो. पण हे करायला स्वत:चा कारखाना कुठे होता? संधी मिळाली म्हणून आनंदात होतो. सब असेंब्ली इकडून तिकडून बनवून घेतल्या व मित्राच्या कारखान्यात त्या जोडल्या व टेस्टिंग केले, घेतलेल्या कामात यश मिळाले. अशा संधी मग सतत यायला लागल्या ज्याचे डिझाईन मी पूर्वी कधीच केले नव्हते, ना मला तसा अनुभव होता. पण आपण करू शकतो हा प्रबळ आत्मविश्वास होता आणि त्याचे कारण असे की मला या पूर्वी टेक्निकल अडचणी सोडवण्यात जे शिकायला मिळाले ते कुठल्याही पुस्तकात मिळाले नसते.

स्वत:चा कारखाना असावा व त्यासाठी एम.आय.डी.सी मध्ये जागा शोधत होतो. काही दिवसात गोविंदरावजी मराठे औद्योगिक वसाहतीमध्ये स्वत:ची जागा घेतली. कारखाना बांधून २००७ मध्ये पूर्ण झाला. कारखान्याचे उद्‌घाटन दसऱ्याचे दिवशी महाराष्ट्राचे तत्कालीन वित्त मंत्री जयंतराव पाटील यांच्या हस्ते झाले. हायड्रोलिक सिस्टिम्स बरोबर हायड्रोलिक सिलेंडर्स बनवणे हे याआधी डोक्यात होतेच. त्याचे प्रशिक्षण वा अनुभव नव्हता व तसे प्रशिक्षण कोणी देतही नव्हते. पण ते करायचे, ही जिद्द आणि चिकाटी मात्र होती. सिलेंडर्स बरोबर स्पेशल पर्पज हायड्रोलिक प्रेसचे डिझाईन करून बनवणे सुरू केले.

मला इथे सांगायला अभिमान वाटतो की मी केलेल्या कुठल्याही प्रोजेक्टमध्ये मी कधीही अपयशी झालेलो नाही. २५/२८ वर्षांपूर्वी मी विद्यार्थी होतो व आजही आहे.

मागील १२-१५ वर्षात आम्ही १५० एच.पी. पर्यंतची सिस्टिम्स डिझाईन करून, बनवून ती कार्यान्वित केली आहेत. Import substitution देखील केली आहेत.

आज माझ्या उद्योगात माझा मुलगा शंतनू हा B.E. व M.B.A. पूर्ण करून पूर्ण वेळ उद्योगात आला आहे.

व्याप्ती वाढावी व आपल्या कुळाचे नाव देखील असावे म्हणून Bhave Hydraulics Pvt. Ltd. ही कंपनी सुरू केली व Sudhaseet Engineers ही कंपनी त्यामध्ये मर्ज केली आहे.

गोविंदरावजी मराठे औद्योगिक वसाहतीच्या संचालक व उपाध्यक्षपदी राहून मी २०१६ पासून आजपर्यंत जबादारी सांभाळत आहे. त्याशिवाय लघु उद्योग भारतीची सांगली जिल्ह्याची अध्यक्ष या नात्याने जबाबदारी आहे.

मागील काही वर्षांपासून मी पाहतोय की तरुण वर्ग हा जास्त करून IT मध्ये लठ्ठ पगाराच्या नोकरीमागे धावतोय. माझे इथे सांगणे आहे की परदेशी जरूर जा पण शिकण्यासाठी व अनुभव घेण्यासाठी. त्या देशांमध्ये आता तिथे स्थायिक होण्याच्या परिस्थिती तिथे नसणार आहेत, तिथली राजकीय व सामाजिक परिस्थिती त्याला जबाबदार आहे.

भारतात उद्योगांना येत्या १०-१५ वर्षात सुवर्णसंधी आहेत. माझे स्नेही श्री. दीपक शिंदे (म्हैसाळकर) यांची निवड HAL च्या स्वतंत्र संचालकपदी झाल्यामुळे, मला जानेवारी २०२३ मध्ये Hindustan Aeronautics ला जाण्याचा योग आला. त्यांचे एकूण तीन कारखाने पाहिले इंजिन, एरोस्पेस व हेलीकॉप्टर डिव्हिजन. तिथल्या अधिकाऱ्यांनी सांगितले की HAL/ISRO/DRDO सारख्या संस्था स्टार्टअप पासून ते लघु व मध्यम उद्योगांना सप्लायर होण्यासाठी पाच वर्षांपर्यंत हात धरून सर्वतोपरी सहाय्य करतात. स्वातंत्र्योतर काळात आपल्याकडे खाजगी उद्योग मोठे नव्हते व अवजड उद्योगामध्ये गुंतवणूक करण्याची परिस्थिती नसेल त्यामुळे भारत सरकारने असे मोठे उद्योग सुरू केले. पण कोणत्याही सरकारचा उद्देश उद्योग करणे नसतेच व नसावेच. शिवाय मागील दहा वर्षातली धोरणे पाहिली तर भारत सरकारला आपली गुंतवणूक काढून घेऊन त्या उद्योगामध्ये खाजगी क्षेत्रातल्या उद्योगांनी आले पाहिजे अशीच आहेत. अमेरिकेत कोणतेच उद्योग सरकारी नाहीयेत. संरक्षण खात्याने आपली द्वारे स्टार्टअप सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी खुली केली आहेत. याचा फायदा नव्या तरुण पिढीने घेतला पाहिजे.

उद्योगात नव्याने येणाऱ्यांनी हे लक्षात ठेवावे की ध्यास, चौकटी बाहेर विचार करण्याची क्षमता, प्रामाणिकपणा, चिकाटी व जिद्दीच्या जोरावर तुम्ही कधीच अयशस्वी होऊ शकत नाही. आधी नाव कमवा मग पैसे आपोआप पाठीमागून येतात.

किर्लोस्कर समुहाचे द्रष्टे उद्योगपती शंतनुराव किर्लोस्करांच्या १९७८ सालच्या पत्राचा मजकूर खाली देत आहे.

***व्यवसाय, उद्योग, संघटना ही चढाओढीची क्षेत्रे आहेत. या क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर लायकीच सिद्ध करावी लागते. धोका पत्करला पाहिजे. श्रम केलेच पाहिजेत. यश मिळाले तरी डोकं शांत ठेवलेच पाहिजे. अपयश पदरी आले तरी निराशेला बळी पडायचे नाकारले पाहिजे. धडपडून पुन्हा उठायला पाहिजे. पुन्हा प्रयत्न करायला पाहिजे.***

***प्रगतीचा मार्ग हा असाच असतो. यशापर्यंत पोहोचायला हा एकच राजमार्ग आहे. इथे पळवाटा, आड मार्गाचा उपयोग नाही.***

**संपर्क :** १०, यशवंत सोसायटी, आनंद नर्सिंग होम जवळ, मिरज ४१६४१० **भ्रमणध्वनी :** ९३७११७८७८२

⌘⌘⌘


## 'भावे-प्रयोग'मध्ये द्यायच्या जाहिरातींचे दर

पाव पान रु. ५,००/- अर्धे पान रु. १,०००/- पूर्ण पान रु २,०००/-
संपूर्ण अंक प्रायोजकत्त्वाचे रु. १०,०००/-
रंगीत आवृत्तीचे दर दुप्पट राहतील.

आपल्या व्यवसायाची जाहिरात भावे-प्रयोगमध्ये जरूर द्यावी ही विनंती.

# रमणीय - श्री क्षेत्र बनेश्वर

© डॉ. सरिता विनय भावे, मुंबई.
छायाचित्र क्रेडिट – डॉ. सरिता भावे.

मित्रांसमवेत बाईक सुसाट पिटाळायला, मनसोक्त हुंदडायला तयार असणारी तरुण पिढी कालांतराने जुनी होत गेली तरी ती वृत्ती मात्र नवीन पिढ्यात तशीच शाबूत राहते! कर्मधर्मसंयोगाने अशीच एक मैत्रीण माझ्या वाट्याला आली आहे, जिच्यासाठी तिच्या स्कूटीची धाव आणि रुबाब बसंतीच्या 'धन्नो'पेक्षा तीळमात्रही कमी नाही. त्यामुळे मी पुण्यात पोचल्यापोचल्या तिने प्रत्यक्ष पुणे आणि आजूबाजूचा परिसर, शक्य तितका या स्कूटी सॉरी धन्नोवर पादाक्रांत करायचा प्लॅन लगेच जाहीर करून टाकल्यावर मला फारसे आश्चर्य वाटले नाही. 'मला आता सवय नाही राहिली गं, इतका वेळ मागे बसायची.' या माझ्या लेमळट, कमकुवत सबबीला तिने साहजिकच लगेच धुडकावून लावले. माझ्यासारखी 'गोरगरीब बकरी'(?!) अशी आपसूक गावल्यावर ती तिचा घोडदौड करायचा चान्स बरा घालवणार होती!



माझ्या आवडीच्या अगदी 'मस्ट' अशा दोन जागा सोडल्या तर बाकी पुणे दाखवायची जबाबदारी तिने स्वत:हुन तिच्या अंगावर घेतली होती. मला साहजिकच याबाबतीत थोडी धाकधूक होती कारण माझ्या पुणे भेटीचा एक हेतू मला भविष्यकाळात लेख लिहायला 'मटेरियल' (पक्षी-विषय!) मिळावे असा सुद्धा होता. तो चिंताक्रांत भाव माझ्या चेहऱ्यावर उमटत असतानाच, 'तुला निसर्गरम्य जागा आवडतात ना आणि प्राचीन मंदिरे सुद्धा....आणि या दोन्ही गोष्टी जर एकाच ठिकाणी तुला मिळाल्या तर....?' आता तिच्या गळाला माझा मासा हमखास लटकणार याची माझ्या चेहऱ्यावरून तिला लगेच कल्पना आली असावी! '....तर मग तुला बनेश्वर नक्की आवडेल.' असे तिचे वाक्य पूर्ण करून, तिथे जाऊन मला प्रत्यक्षात काय बरे बघायला मिळेल असे माझ्या भावविश्वात रमायला तिने मला सोडून दिले!



दुसऱ्या दिवशी पहाटे लवकर उठून, स्नानादी आटोपून, चहा बिस्किटे खाऊन आम्ही निघालो. वाटेवर धन्नोला गवताऐवजी पेट्रोलचा चारा घालून तिच्याही पोटापाण्याची व्यवस्था करून टाकली. पुण्यातील तमाम महिला स्कूटीस्वार ज्याप्रमाणे स्कार्फमध्ये स्वत:ला पूर्णत: बंदिस्त करून घेतात, त्याला ही मैत्रीण सुद्धा अपवाद नव्हती. अस्सल 'पुणेकर' जामानिमा करून, भ्रमणध्वनीवर 'गुगल मॅप काकूंचे' 'मार्गदर्शक'पर प्रवचन लावून बनेश्वरच्या दिशेने तिने तिची स्कूटी पिटाळायला सुरूवात केली. जून महिन्याच्या अखेरीस अपेक्षित असणारा, कधी भुरभुरू तर कधी रिमझिम पडणारा पाऊस अंगावर घेत, गार वाऱ्याच्या झुळुकांच्या आल्हाददायक सोबतीने, आजूबाजूची प्रसन्न हिरवाई डोळ्यांत भरून घेत, 'सुहाना सफर और ये मौसम हसीन....', 'मंजिल से बेहतर लगने लगे है ये रास्ते....' या सारख्या काव्यात्मक पंक्तींना अनुभवत आमची मार्गक्रमणा सुरू झाली.




पुण्याच्या दक्षिणेला तीस कि.मी. अंतरावर, पुणे-सातारा हमरस्त्यावर असणाऱ्या नसरापूर गावापासून बनेश्वरचा फाटा फुटतो. नसरापूरपर्यंत पी. एम. टी. किंवा एस. टी. बसने येऊन तिथून साधारण एक दीड कि. मी. अंतरावर असलेल्या बनेश्वरच्या परिसरात पायी जाता येऊ शकते. अथवा दोन चाकी, तीन चाकी, चार चाकी वाहनांनी डायरेक्ट बनेश्वरला पोचता येऊ शकते. तिथे पार्किंगची सोय आहे. तसेच चहा, कॉफी, शीतपेये, हलक्या नाश्त्याची व्यवस्था करणाऱ्या मोजक्या टपऱ्या तिथे आहेत. घरून खाद्यपदार्थ नेऊन वनभोजनाचा आनंद सुद्धा घेता येऊ शकतो. प्रसाधनगृहांची सोय असल्याने विनाकाळजी काही तास इथे आरामात घालवता येऊ शकतात. इथे मंदिराचा अंतर्भाग वगळता बाह्यपरिसरात छायाचित्रणाला परवानगी आहे.

निसर्गरम्य ठिकाणी एखादे सुंदर शिवालय, पुष्करणी आणि धर्मशाळा बांधली तर रसिक मंडळींना मन रमवण्यासाठी एक आश्रयस्थान होईल, असा विचार करून इ. स. १७४९ साली नानासाहेब पेशव्यांनी शिवगंगा नदीच्या तीरावर हे मंदिर बांधून घेतले होते. यासाठी त्यांना त्याकाळात साधारण साडे अकरा हजार रुपयांचा खर्च आला होता. दाट झाडीत म्हणजे बनात असलेला ईश्वर म्हणजे बनेश्वर (काही ठिकाणी 'बनशंकर' असा सुद्धा उल्लेख आहे) अशी संकल्पना इथे प्रत्यक्षात आणण्याच्या त्यांच्या रसिकतेला भरभरून दाद द्यावीशी वाटते. चारही बाजूंनी बंदिस्त आवारात मंदिर बांधलेले असून मंदिराच्या आग्नेय बाजूस चिरेबंदी प्रवेशद्वार कमान आहे. या दरवाजातून पायऱ्या उतरून आत आल्यावर समोर पाण्याची दोन कुंडे दिसतात. पाणी स्वच्छ ठेवण्यासाठी एका कुंडात मासे तर दुसऱ्या कुंडात कासवे सोडलेली आहेत. कासवे असलेल्या कुंडात पाणी पडण्यासाठी नेहमीचे फक्त गोमुख कोरण्याऐवजी गायीची पूर्ण प्रतिमा कोरलेली दिसते. यातल्या उत्तरेकडील (कासवे असलेल्या) कुंडाच्या पश्चिमेला नंदीची मेघडंबरी आहे. या नंदी मंडपाच्या समोर बनेश्वरचे मंदिर आहे.





या पूर्वाभिमुख शिवालयाचे बांधकाम अतिशय साधे आहे. सोपा, सभामंडप आणि गर्भगृह असे त्याचे तीन भाग आहेत. सोपा तीन खणांचा असून त्यावर चौकोनी शिखर आहे. सोप्याच्या चार खांबांवर कमलपत्रांची नक्षी कोरलेली आहे. मधल्या खणाच्या छताला पोर्तुगीज बनावटीची, काशाची, इ. स. १६८३ सालचा रोमन आकडा व क्रुसाचे चिन्ह अंकित केलेली विशाल घंटा टांगलेली आहे. थोरले बाजीराव पेशवे यांचे धाकटे बंधू चिमाजी आप्पा यांनी इ. स. १७३७ ते १७३९ या कालखंडात उत्तर कोकणातल्या पोर्तुगीजांचा पराभव करून दमणपासून वसईपर्यंतची कोकणपट्टी मुक्त केली. या मोहिमेत मराठ्यांनी अनेक चर्चमधून अशा प्रकारच्या घंटा हस्तगत केल्या होत्या. {थोडे विषयांतर - यातील काही घंटा पंचधातूच्या सुद्धा आहेत. बनेश्वरव्यतिरिक्त अशा प्रकारच्या पोर्तुगीज घंटा अजून कुठल्या मंदिरात आहेत याबाबत बरीच उलटसुलट माहिती आंतरजालावर दिसते. बरेच संदर्भ वाचल्यावर भीमाशंकर (गाव भोरगिरी, ता. खेड, जि. पुणे), जेजुरी (ता. पुरंदर, जि. पुणे), मेणवली (ता. वाई, जि. सातारा), शिखर शिंगणापूर (ता. माण, जि. सातारा) आणि नारोशंकर (नाशिक) या मंदिरांत अशा घंटा आहेत असे मला खात्रीशीर रीत्या वाटत आहे.} सोपा ओलांडून पुढे गेल्यावर एकही खांब नसलेला सभामंडप लागतो. त्याला वर घुमट आहे. सभामंडपातून पायऱ्या उतरून खाली गर्भगृहात गेल्यावर कायम पाणी असलेल्या एका खोल खळग्यात उत्तराभिमुख शिवलिंग आहे. हे शिवलिंग प्रतिकात्मक असून त्या झाकणाखाली असलेल्या पोकळीत गोलाकार, पाच उंचवटे असलेला शिवस्तंभ आहे.



बनेश्वर मंदिराच्या परिसरातील उंचावरील पाणी एकत्र गोळा करून ते आधी वर्णन केलेल्या पाण्याच्या एका कुंडात सोडले जाते. ही दोन्ही कुंडे एकमेकांना जोडलेली असून एक कुंड पूर्ण भरल्याखेरीज दुसऱ्या कुंडात पाणी येत नाही. तिथून दोन फरसबंदी वाटांनी ते पाणी गर्भगृह आणि बनेश्वर मंदिराच्या चहूबाजूंनी खेळवले आहे. अशा अत्यंत मनोवेधक असलेल्या या पाण्याच्या चक्रव्यूहाने बनेश्वरचे मंदिर एकप्रकारे जलमंदिरच बनले आहे.

या रमणीय परिसरात अनेक वृक्ष वेली, किलबिलाट करणारे नानाविध पक्षी आणि भिरभिरणारी फुलपाखरे यांची अगदी रेलचेल आहे. त्यांच्या सुखद सानिध्यात आपल्या प्रापंचिक दुःखांचा काही काळ का होईना विसर पडतो. यासाठी तरी या निसर्गरम्य स्थळाला आवर्जून भेट द्यायलाच हवी!

**संदर्भ :** १) श्री क्षेत्र बनेश्वर महादेव देवस्थान ट्रस्ट (नसरापूर, ता. भोर, जि. पुणे) माहितीचा बोर्ड.

२) सहली एक दिवसाच्या, परिसरात पुण्याच्या (स्नेहल प्रकाशन, पुणे - ३०), प्र. के. घाणेकर (२०००) - बनेश्वर, पान क्र. २१३.

३) https://timesofindia.indiatimes.com/pune-times/for-whom-the-bells-toll/articleshow/26593375.cms

४) https://military-history.fandom.com/wiki/Chimaji-Appa

**आभार : मध्यवर्ती पुण्यात राहत असूनही स्कूटीने मला इथे आणणाऱ्या माझी मैत्रीण साधना चौधरी हिचे मनापासून आभार!**

⌘⌘⌘

**संपर्क :** ३०६, डॅफोडिल, नीलकंठ गार्डन, गोवंडी(पूर्व) मुंबई ४०००८८ **भ्रमणध्वनी :** ९८६९०५१८१९

**आवाहन** सर्व भावे कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना विनंती की, त्यांनी आपल्या कुटुंबियांपैकी कोणाचेही विशेष प्राविण्य, सत्कार, गौरव, वाढदिवस अथवा महत्त्वाच्या पदावर नियुक्ती इत्यादी प्रकारची कोणतीही महत्त्वाची घटना त्या प्रसंगाच्या फोटोसह bhave1956@gmail.com या मेलवर पाठवावी, किंवा अभय शंकर भावे यांना ९४२२३०६०३३ या भ्रमणध्वनीवर Whats App वर पाठवावी म्हणजे त्याचे वृत्त पुढील अंकात समाविष्ट करता येईल. अशा वृत्तांमुळे आपल्या आनंदात सर्वच भावे कुलबंधू, भगिनी व माहेरवाशिणींना सहभागी होता येईल.

'भावे-प्रयोग' हा प्राजक्तचा अंक सर्व भाव्यांना व माहेरवाशिणींना कोणतीही वर्गणी न घेता पाठवला जातो. अंक पाठविण्याचा संमेलनाची वर्गणी, आजीव सदस्यत्त्व किंवा स्वनिधीला दिलेली रक्कम याचेशी कोणताही संबंध नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. म्हणजेच आपण सदस्यत्त्व, स्वनिधीची रक्कम द्यावीच, पण 'भावे-प्रयोग' हा प्राजक्तचा अंक आला नाही तरी जरूर कळवावे. अंक शिल्लक असल्यास नक्की पाठविला जाईल. आपला बदललेला पत्ता, फोन नंबर व मेल अॅड्रेस खाली दिलेल्या पत्त्यावर पाठवावा किंवा फोनवर कळवावा, म्हणजे सर्व मेलिंग लिस्टमधे तो अद्ययावत होईल. 'भावे-प्रयोग'या भावे मित्र मंडळाच्या प्राजक्तच्या अंकासाठी साहित्यही या पत्त्यावर पाठवावे. **भावे मित्र मंडळ, द्वारा एल.डी. भावे अॅंड सन्स १२४४, आपटे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४.**

# DESIGN THINKING

© Ar. Adhishri Abhay Bhave, Pune.

What is Design Thinking?

What comes first in your mind while reading this term Design Thinking? How to think about your Design OR how to design your thinking. Well, it is both ways. Let us first understand what design is. What all the designers can design? Interior Design, Landscape Design, Architectural Design, Product Design, Graphic Design, and Fashion Design are very well-known Design fields. But the designers also design Engines, Digital communication, User experiences, Organizations, Brands, Advertisements, Businesses, Interfaces, Services, Cultures, Mindsets, etc. Where there is Innovation there is design. What is Design?

**Design is a solution to a problem.**

John Maeda
Designer, Technologist

Design is about understanding needs and being sensitive to issues, identifying problems that need to be solved, creating innovative appropriate solutions, and considering aspects of sustainability such that it makes a positive difference to life in our universe.



Design Thinking is a problem-solving approach to create innovative solutions for Businesses, Organizations, and Society. It is a human-centered design method to reach a best solution to address the problem.

The process starts with Empathizing – to understand the problem better and listen to the unsaid. Followed by, understanding, and defining the problem, brainstorming solutions, prototyping, and testing and iterating until the best solution is found.



These stages include different research methodologies, observation techniques, creative thinking techniques, user identification, analyzing data, decoding the unsaid of surveys, immersive learning and creative habits, mindful design, designing mood boards, thinking without biases and fallacies in us, thinking in the ecological context, social context, creating narrations, stories, and hypothesis, creating for sustainability, etc. the factors to be considered in design thinking procedure are endless every factor is worth an article.

With every design, there are chances of failure but with design thinking as a tool, there is always scope for re-designing, re-framing, re-defining, and re-thinking of solution. This is an iterative process that takes the designer back to the stage which needs re-consideration.

The design thinking process builds on aspects like Design elements, story creations, form transitions, forms in the environment, connections, and commute between forms, sketching for ideation, creative exploration of products and concepts, and creative thinking.

Design thinkers are highly creative people. Let us see what creativity is all about. Is it the arts and crafts skills we use to express ourselves artistically? OR is it the ability to decorate something with the utmost artistic eye? Well, Creativity is the ability to produce or develop original work, theories, techniques, or thoughts. A creative individual typically displays originality, imagination, and expressiveness, such as products, use of products, methods, work cultures, thoughts, habits, disciplines, rituals, art, processes, services, organizations, and solutions.

Design thinking leads you to be a leader irrespective of what your position and role is in your organization or society. The skill enables you to think divergently with all the sustainable aspects that cater to a better society.



**Images Credit -** PngTree, Freepik, vectorstock

**Contact :** Flat No 3, Shreemangal Apt, Surekh Soc. Gulmohar Path, Erandawane, Pune 411004.
W. A. 9423507624/ Calling 9370397923

## सहवेदना

**डॉ. अनुराधा सुरेश भावे, पुणे.** यांचे दि. २ जून २०२४ या दिवशी निधन झाले. त्यांच्या पश्चात अविनाश, डॉ. शिरीष व डॉ. नितीन हे मुलगे सुना, नातवंडे असा परिवार आहे.

त्यांच्या आत्म्याला सद्गती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.



**किशोर मोरेश्वर भावे, वाकड, पुणे.** यांची रेन वॉटर हार्वेस्टिंगची कल्पना पिंपरी-चिंचवड कॉर्पोरेशनने स्वीकारली व तसे पत्र पिंपरी-चिंचवड कॉर्पोरेशनने त्यांना दिले आहे. त्यांना पिंपरी-चिंचवड कॉर्पोरेशनच्या कमिशनर साहेबांसमोर प्रेझेंटेशन द्यायला बोलावले आहे. महाराष्ट्र शासनासमोरही ते प्रेझेंटेशन देणार आहेत. सध्याच्या काळात कॉर्पोरेशन किंवा महाराष्ट्र शासनासारख्या यंत्रणांकडून रेन वॉटर हार्वेस्टिंगच्या कल्पना प्रत्यक्षात आणणे हेच एक मोठे अवघड काम आहे, त्यामुळे किशोर मोरेश्वर भावे यांचे हे यश मोठेच म्हणावे लागेल.

**भावे मित्र मंडळातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!!!**

**जुई किरण भावे, नवी मुंबई.** हिला XLRI मध्ये MBA करता ॲडमिशन मिळाली. तिचे IIM² मुंबई आणि IIM² कोळीकोडे येथेही सिलेक्शन झाले होते पण MBA HR साठी भारतात XLRI हीच top इन्स्टिट्युट असल्याने IIM² च्या ऑफर्स तिने स्वीकारल्या नाहीत.

**भावे मित्र मंडळातर्फे तिचे हार्दिक अभिनंदन!!!**




## वसतीगृह व्यवस्थापन डिप्लोमा

वसतीगृह व्यवस्थापन हा एक वर्षाचा डिप्लोमा मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्याद्वारा जुलै २०२४ पासून दर शनिवारी व रविवारी ऑनलाईन पद्धतीने सुरू होत आहे.

या अभ्यासक्रमाची योजना व निर्मिती प्रा. रत्नप्रभा राजहंस, पूर्वीच्या रत्नप्रभा भावे यांनी केली आहे.

असा अभ्यासक्रम कोणत्याही विद्यापीठात नाही.

परंतु दिवसेंदिवस वसतीगृहांची गरज व संख्या वाढत आहे.

अभ्यासक्रमात पाच विषय आहेत.

**१) वसतीगृह व्यवस्थापन. २) वसतीगृह व्यवस्थापन कौशल्ये.**
**३) मानसशास्त्र. ४) संबंधित कायदे.**
**५) हिशोब लेखन.**

प्रोजेक्ट प्रत्येक विद्यार्थ्याने करायचा आहे.


मुक्त विद्यापीठाच्या नियमांचे अधीन राहून कोर्स चालेल.

प्रा. रत्नप्रभा राजहंस या २७ वर्षे कॉमर्स अध्यापिका व ९ वर्षे महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत 'सहसचिव' म्हणून कार्यरत होत्या.

अधिक माहितीसाठी फोन नंबर्स

१) रत्नप्रभा राजहंस 9420426138

२) ॐ ग्रामण्य इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन एक्सेलन्स.
डायरेक्टर श्री. एस. जी. चव्हाण 9011863999



# भावे मित्र मंडळ, एक परिवाराचा सदस्यत्व आणि स्वनिधीचा उपक्रम.

**'भावे मित्र मंडळ-एक परिवार'** ही संस्था २००६ मध्ये नोंदणीकृत झाली असून संस्थेचे सदस्य होण्यासाठी १८ वर्षांवरील सर्व कौशिक गोत्री चित्पावन भाव्यांनी मंडळाचे सदस्यत्व स्वीकारावे असे आवाहन भावे मित्र मंडळाकडून वेळोवेळी केलेले आहे. याला प्रतिसाद म्हणून अनेकांनी अगदी लहानग्या मुलांसह सदस्यत्व स्वीकारले आहे. **डिसेंबर २०१८ मध्ये उज्जैनला झालेल्या संमेलनातील निर्णयामुळे सदस्यत्त्वाची रक्कम आता एक हजार रुपये झाली आहे.**

जुलै, २००८ मध्ये झालेल्या भावे मित्र मंडळाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत भावे मित्र मंडळाचे कार्य पुढे नेण्यासाठी संस्थेचे सदस्य वाढविणे व स्वनिधी वाढविण्याबाबत खालील निर्णय झाले. १) शिक्षण व तत्सम सहकार्य, २) व्यावसायिक सहकार्य/व्यवसायाकरिता कमी व्याजदरात भांडवल पुरविणे ३) वैद्यकीय कारणांसाठी सहकार्य, मोठ्या शस्त्रक्रियेसाठी मदत (परत बोलीच्या तत्वावर) ४) आपत्कालीन सहकार्य अशा कारणांसाठी आणि भावे मित्र मंडळाच्या कार्यालयीन व्यवस्थापनासाठी स्वनिधी जमवावा असे ठरले. **प्रत्येक कमावत्या व्यक्तीने रु. ५०००/- स्वनिधीसाठी द्यावेत** असे आवाहन केले गेले. यापेक्षा अधिक रक्कम दिल्यास स्वागतच आहे असेही आवाहन कार्यकारिणीने केले होते. त्यानुसार अनेकांनी स्वनिधीसाठी भरघोस निधी देऊन चांगला प्रतिसाद दिला. अनेकांनी एक रकमी रु.५०००/- देण्यास असमर्थता दर्शवल्याने रक्कम हप्त्याने स्वीकारण्याचीही योजना समोर आली.

भावे मित्र मंडळाचे अध्यक्ष, श्रीवर्धन वामन भावे यांनी प्रत्येक भावे कुटुंबाकडून रु. १०००/-(रु. एक हजार फक्त) वार्षिक वर्गणी दरवर्षी घ्यावी असा प्रस्ताव ठेवला. या प्रस्तावाला अभय शंकर भावे यांनी अनुमोदन दिले. कुलबंधूंचे उपलब्ध असलेले संपर्क पाहता तीन हजारांपेक्षा अधिक कमावत्या व्यक्ती आहेत. **या आवाहनास मान देऊन अनेकांनी सदस्यत्त्व स्वीकारले आहे, तसेच स्वनिधीही दिलेला आहे.**

**आपणही सदस्यत्त्वाची रक्कम रुपये एक हजार व वार्षिक वर्गणी रुपये एक हजार देऊ शकता किंवा खाली दिलेल्या बँक अकाऊंटमध्ये रक्कम ट्रान्सफर करावी अशी विनंती आहे.**

**बँकेचे डिटेल्स याप्रमाणे आहेत. Bank Name** - IDBI Bank, **Branch** - Deccan Gymkhana, Pune. **Account Name** - Bhave Mitra Mandal, **Saving A/C Number** - 50210010010723, **IFSC** - IBKL0000502. **रक्कम ट्रान्सफर केल्यावर अभय शंकर भावे यांना ९४२२३०६०३३ या क्रमांकावर किंवा** bhave1956@gmail.com **या मेलवर संपूर्ण नाव व पत्यासह कळवावे म्हणजे पावती मेलने पाठवता येईल.**

# भावे मित्र मंडळाचा एक उपक्रम - भावे शिक्षण निधी

भावे मित्र मंडळाच्या बैठकीत शिक्षण निधीच्या वाढीसंबंधी काय करता येईल याबद्दल नेहमीच विचार विनिमय चालू असतो.

पहिला कुलवृत्तांत सन १९४० मध्ये प्रकाशित झाला. त्यानिमित्ताने जो निधी शिल्लक उरला होता, त्या रकमेचा विनियोग कसा करावा या कल्पनेतून भावे शिक्षण निधीचा विचार पुढे आला. अनेक कुलबंधूंचे पाठिंब्याने 'भावे शिक्षण निधी'ची स्थापना झाली. जवळजवळ सत्तर वर्षे हे कार्य पहिला कुलवृत्तांतकर्ते गोविंद वासुदेव भावे व त्यांचे सहकारी, पुढे त्यांचे चिरंजीव मधुसूदन गोविंद भावे यांनी चालवले. भावे मित्र मंडळाची स्थापना झाल्यावर २००८ साली भावे शिक्षण निधी हा भावे मित्र मंडळात समाविष्ट झाला. त्यानंतर कामास थोडा वेग आला. आता मंडळाच्या त्रैमासिकातून दरवर्षी निवेदन दिले जाते व भावे कुलोत्पन्न गुणवान विद्यार्थ्यांना पुरस्कार, गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. असे असले तरी अजून मोठ्या प्रमाणात या निधीमध्ये भर पडल्यास, वाढत्या महागाईच्या काळात वाढलेल्या शिक्षण खर्चाची तोंडमिळवणी करणे शक्य होईल.

भावे शिक्षण निधीतून आजवर अनेक विद्यार्थ्यांना मदत मिळाली आहे. ही मदत 'फूल ना फुलाची पाकळी' अशा स्वरूपाची आहे हे मान्य केले तरी विद्यार्थ्यांना त्या त्या वेळी जी मदत झाली आहे त्याबद्दल अनेकांना कृतज्ञता वाटते व ते स्वाभाविकही आहे. ही मदत थोडी असली तरी आपल्या कुलाने प्रेमाने व आपुलकीने दिलेला तो प्रोत्साहनपर आशिर्वाद आहे ही भावना अनेक कुलबंधूंशी बोलताना लक्षात आली.

**ही भावना लक्षात घेता ज्या भावे कुल बंधू भगिनींना अशी मदत अल्पस्वल्पही का असेना, मिळाली आहे त्यांचेसाठी विनंती वजा आवाहन करीत आहोत की आता जे कुलबंधू आर्थिकदृष्ट्या स्थिरावले आहेत त्यांनी 'भावे शिक्षण निधी'स सहाय्य करून हा निधी वाढवण्याचे कामी पुढाकार घ्यावा. एक कल्पना अशी आहे की प्रत्येकाने दरवर्षीची योजना निश्चित करून तशी रक्कम तयार ठेवून ही रक्कम 'भावे शिक्षण निधी'स देणगीचे स्वरूपात द्यावी. आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने, लग्नाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने किंवा भावे मित्र मंडळाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्तानेही अशी योजना आपणास तयार करता येईल.**

अर्थात ज्यांनी विद्यार्थीदशेत या निधीतून काही सहाय्य घेतलेले नाही अशांनीही शिक्षण निधीस सहाय्य करण्यासाठी हे निवेदन आहे हे सांगणे नकोच. 'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणे हा निधी वाढीला लागेल असा विश्वास वाटतो. सर्वांनी मनावर घेतले तर हे काम सोपे होईल. 'केल्याने होत आहे रे ! आधी केलेचि पाहिजे !' अधिक काय लिहावे!

**अध्यक्ष, भावे मित्र मंडळ**

**शिक्षण निधीच्या देणगीची रक्कम आपल्याला बँकेच्या खात्यात डायरेक्ट जमा करता येईल. त्याचा तपशील खाली दिला आहे.**

**Bank Name** - Janata Sahakari Bank, **Branch** - Karve Road, Pune., **Account Name** - Bhave Mitra Mandal (Ek Pariwar) A/C Bhave Shikshan Nidhi, **Saving - A/C Number** - 007220100038846, **IFSC Code** - JSBP0000007

**रक्कम ट्रान्सफर केल्यावर पर्शराम भावे (९४०३५१६८७५) किंवा अभय भावे (९४२२३०६०३३) यांना कळविणे आवश्यक आहे.**

# प्रज्ञावंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री

© मधुकर गोपीनाथ भावे, ठाणे.

दिनांक २७ मे १९९४ या दिवशी सकाळ उजाडत असताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीजींना झोपेतच नियतीने गाठले होते. ज्ञानाची तपस्या करणाऱ्या ब्रह्मऋषीला पुण्याचेच मरण आले, असे मरण यायला भाग्य लागते. ९४ व्या वर्षी झोपेमध्येच शास्त्रीजींनी चिरविश्रांती घेतली.

महाराष्ट्राच्या या प्रकांडपंडिताची आणि प्रज्ञावंताची ओळख महाराष्ट्र विसरलेला आहे. पण, वाईची प्राज्ञ पाठशाळा आणि त्यातील विश्वकोषाचे १८ खंड ही महाराष्ट्राची ज्ञानगंगा आहे. कृष्णामाईच्या तीरावर प्राज्ञ पाठशाळेची वास्तू ९६ वर्षांपूर्वी उभी राहिली. आता नवीन इमारतही झाली. या वास्तुमध्ये १२ हजारांपेक्षा अधिक ग्रंथ हे महाराष्ट्राचे मोठे धन आहे.

यशवंतराव चव्हाण १ मे १९६० रोजी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. त्यानंतर १ नोव्हेंबर १९६० ला म्हणजे बरोबर ६ महिन्यांनी यशवंतरावांनी साहित्य-संस्कृती मंडळाची स्थापना केली. त्याचे अध्यक्षपद कोणाला द्यायचे? महाराष्ट्रात विद्वानांची कमी नाही. महाराष्ट्राची निर्मिती ख्रिस्तपूर्व ८ व्या शतकात झाली. ज्ञानकोषकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी 'एनसायक्लोपीडीया' या इंग्रजी शब्दाचा 'ज्ञानकोष' हा प्रतिशब्द प्रमाणित केला. त्या ज्ञानकोषकार केतकरांची परंपरा महाराष्ट्रात ज्यांनी पुढे चालवली ते लक्ष्मणशास्त्री आहेत. केतकर यांच्याही एक पाऊल पुढे जाऊन शास्त्राचा अर्थ सांगताना शास्त्रीजींनी पहिल्या प्रथम हे जाहीर केले की, हिंदू धर्मशास्त्रामध्ये अस्पृश्यतेला कुठेही आधार नाही. महात्मा गांधी यांच्यासमोर त्यांनी हा विचार स्पष्ट केला होता. सतीच्या चालीला धर्मशास्त्राचा आधार नाही, असाही तर्क शास्त्रीय पुराव्यांनी शास्त्रीजींनीच पहिल्याप्रथम जाहीरपणे सांगितला. अशा या शास्त्रीजींची आठवण यशवंतरावांना नेमकी आणि नेमक्यावेळी झाली. १९३० साली यशवंतराव जेव्हा तरुण वयात स्वातंत्र्याच्या चळवळीत उतरले होते त्यावेळी शास्त्रीजींचे भाषण त्यांनी ऐकले होते. शास्त्रीजी विद्वान आहेत, हे सर्वांना माहिती होते. पण, गांधीजींच्या असहकार आंदोलनात उतरल्यावर शास्त्रीजींनी घोषणा दिली होती... 'शास्त्र हे शस्त्र बनले पाहिजे...' यशवंतरावांच्या कानात ते शब्द तब्बल ३० वर्षे घुमत असले पाहिजेत... यशवंतरावांनीच शास्त्रीजींना अध्यक्ष होण्यासाठी विनंती केली आणि महाराष्ट्राच्या ज्ञानसंपदेचा हा फार मोठा ठेवा त्यामुळे शास्त्रीजींच्याकडून निर्माण झाला. त्याचे श्रेय जसे शास्त्रीजींना आहे, तेवढेच यशवंतरावांनाही आहे. कारण ज्ञानाची आणि गुणांची पूजा कुठे करता येईल याचा पत्ता माहिती असणे हेसुद्धा सुसंस्कृत नेतृत्त्वाचे सगळ्यात मोठे लक्षण आहे! शास्त्रीजींनी सुरुवातीला नकार दिला होता. आणि कारण असे सांगितले होते की, 'माझ्या कामात तुम्ही रोज फोन करून असं करा... तसं करा... असे सांगणार...' यशवंतराव म्हणाले की, 'शास्त्रीजी मी कसलाही हस्तक्षेप करणार नाही.' आणि मग देशामध्ये पहिल्याप्रथम साहित्य संस्कृती मंडळाची निर्मिती महाराष्ट्रात झाली. त्यावेळच्या भाषणात यशवंतरावांनी सांगितले होते, 'सरकारला दोन डोळे असतील तर... त्यातील एक डोळा 'सांस्कृतिक' असला पाहिजे....' यशवंतरावांचे हे भाषण चालू असताना शास्त्रीजींनी टेबलावर टिचकी वाजवून त्यांना थांबवले आणि बसल्या बसल्या शास्त्रीजी म्हणाले, 'दोन डोळे असतील तर ठीक आहे... पण, सरकारला एकच डोळा असला तर...' यशवंतरावजी क्षणात म्हणाले, 'एक डोळा असला तर तो 'सांस्कृतिक' असेल तर दुसरा डोळा उघडू शकेल...' यशवंतरावांच्या या वाक्यावर उपस्थित असलेल्या मोजक्या बुद्धिवंतांनी वाजवलेल्या टाळ्या आजही आठवतात... अशा सुसंस्कृत मुख्यमंत्र्यांनी शास्त्रीजी यांच्यावर दिलेली जबाबदारी शास्त्रीजींनी कठोर परिश्रम, मेहनत, संशोधन अशी दोन तपे म्हणजे तब्बल २४ वर्षे काम करून फार मोठे संचित महाराष्ट्रासाठी निर्माण केले. ज्यांनी प्राज्ञ पाठशाळा पाहिली असेल, तेथील १२ हजार ग्रंथ कसे जपून ठेवले आहेत... आधुनिक ज्ञान-विज्ञानाची गंगोत्री मराठीत भाषांतरित होऊन कृष्णाकाठावर कृष्णामाईच्या साक्षीने आज सर्वांना उपलब्ध आहे. अशा शास्त्रीजींच्या तिसाव्या पुण्यतिथीची महाराष्ट्र किती दखल घेईल, माहिती नाही. महाराष्ट्रातील आजचे राजकीय, सामाजिक वातावरण हे सुसंस्कृत नाही... तसेच ज्ञान-विज्ञानाच्या बाबतीत अनुकूल नाही. काहीसे धटींगण झालेले आहे. या वातावरणात शास्त्रीजी, त्यांची प्राज्ञ पाठशाळा याचे महत्त्व सरकारला वाटणे जवळपास अशक्य आहे. त्यासाठी यशवंतरावांसारखाच कुशल नेता असावा लागतो. फार थोड्या नेत्यांना या कामाचे मोल माहिती आहे. त्याची जाणीव आहे. शरद पवार मुख्यमंत्री झाल्यावर सौ. प्रतिभाताईंसह त्यांनी शास्त्रीजींच्या भेटीकरिता प्राज्ञ पाठशाळा गाठली. दोन तास चर्चा केली. सुधाकरराव नाईकही प्राज्ञ पाठशाळेत गेले होते. मनोहर जोशीही मुख्यमंत्री असताना गेले होते. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना त्यांनी ८ व्या विश्वकोषाचे अनावरण केले होते. आणि ते म्हणाले होते की, 'विश्वकोष कोषात राहू नये....' त्यानंतर सरकारी मदतीने या सर्व ग्रंथांचे 'डिजीटायझेशन' ही संकल्पना प्रत्यक्षात येऊ लागली. सध्या काय परिस्थिती आहे, माहिती नाही... सध्याचा सांस्कृतिक मंत्रीही प्राज्ञ पाठशाळेत कधी पोहोचलेला नाही. ते असो... सध्या महाराष्ट्राची चाल ज्ञान-विज्ञानाच्या वाटेने नाही, त्यामुळे ही अपेक्षाही नाही. पण, यशवंतराव, शरदराव, मनोहर जोशी, विलासराव, यांच्यासारखे नेते आता विरळ आहेत. अनेक राजकीय नेत्यांना महाराष्ट्रातील 'वाई' हे गाव कशाकरिता प्रसिद्ध आहे, याचीही माहिती नसेल. अजितदादा पवार सातारचे पाच वर्षे पालकमंत्री होते. पण, प्राज्ञ पाठशाळेत कधी फिरकल्याची नोंद नाही. कदाचित किसन वीर यांच्याशी दादांचे जमत नसल्यामुळे असेल... पण त्यांनी जायला हवे होते. अर्थात त्यामुळे शास्त्रीजींच्या कामाला किंवा प्राज्ञ पाठशाळेला कसलाही उणेपणा येत नाही. महाराष्ट्राकरिता ज्ञान-विज्ञानाचे हे मोठे धन हीच खरी महाराष्ट्राची संपत्ती आहे. यशवंतरावांनी शास्त्रीजींची गुणवत्ता जाणली होती. संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे....

**गुणी गुणं वेत्ति, न वेत्ति निर्गुणः**
**बली बलं वेत्ति, न वेत्ति निर्बलः**
**पिको वसन्तस्य, गुणं न वायसः**
**करी च सिंहस्य, बलं न मूषकः**

'तर्कतीर्थ' ही शास्त्रीजींची पदवी त्यांना वयाच्या २२ व्या वर्षी काशी येथे देण्यात आली होती. वेदशास्त्राचे अध्ययन करायला ते काशीमध्ये होते. २२ व्या वर्षी 'तर्कतीर्थ' ही पदवी मिळवणारे या देशातील ते एकमेव आहेत. वेद आणि वेदांचा अर्थ, धर्म आणि धर्मशास्त्राचा अर्थ अनेकवेळा विकृतपणे सांगितला जातो. पण शास्त्रीजींचे पांडित्य पुस्तकी नव्हते. कृतीशील होते.

१९३३ साली शास्त्रीजींनी त्यांच्या घरात एका अस्पृश्य मुलाला संस्कृत अध्ययनासाठी ठेवून घेतले होते आणि या मुलाला कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शास्त्रीजींकडे पाठवले होते. त्याचे राहणे, जेवणखाण हे सर्व शास्त्रीजींच्या घरी असायचे. एका अस्पृश्य मुलाला संस्कृतचे पाठ देणारे शास्त्रीजी. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी एकदिवस शास्त्रीजींच्या या पुरोगामी विचारांची वाईच्या जाहीर सभेत स्तुती केली होती. शास्त्रीजींच्या घरातील स्वयंपाकीण सावित्री गायकवाड ही अस्पृश्य समाजाची होती. शास्त्रीजींची 'तर्कतीर्थ' पदवी किती पुरोगामी विचारांची होती याचा प्रत्यय देणारी ही उदाहरणे आहेत. अशा या शास्त्रीजींनी साहित्य-संस्कृती मंडळाचे आणि विश्वकोषाचे एवढे प्रचंड काम उभे करून ठेवले आहे.

वाईची ही परंपरा आहे. वाई या शब्दाचा दुसरा पर्यायी शब्द.... 'आई' हाच असू शकतो, असे मी मानतो. कारण जन्मलेल्या प्रत्येक मुलाची पहिली शिक्षिका त्याची माताच असते. वाईने ही परंपरा जपली आहे. त्यामुळेच प्राज्ञ पाठशाळेत पूर्वी म्हणजे १९ व्या शतकात 'ॲथेल्लो', 'कोलंबसाचा वृत्तांत', 'पदार्थ विज्ञानशास्त्र' अशी पुस्तके महादेवशास्त्री कोल्हटकरांनी प्रसिद्ध केली. विधवांच्या पुनर्विवाहाचा पुरस्कार त्यांनीही केला होता. आप्पाशास्त्री राशीवडेकर आणि महादेवशास्त्री दिवेकर यांनी धर्मबाह्य शुद्धीकरण, अस्पृश्यतेचे उच्चाटण, बुवाबाजी याच्यावर प्रहार केले होते. ही सगळी पुरोगामी परंपरा पुढे नेणारे शास्त्रीजीच होते. त्यांनी वाईमध्ये प्राज्ञ पाठशाळेच्या कामासाठी एका भव्य अशा प्रिंटींग प्रेसची निर्मिती केली. गोरखपूर येथील 'गीता प्रेस' जेवढा भव्य आहे त्याचप्रमाणे वाईमधील प्राज्ञ पाठशाळेचा प्रिटींग प्रेस अद्ययावत आहे. गेल्या ५०० वर्षांतील सहा हजार ग्रंथ या प्राज्ञ पाठशाळेमध्ये किती काळजीने जपून ठेवले आहेत... एकूण १२ हजार ग्रंथांची सूची प्राज्ञ पाठशाळेत आहे. श्री. अनिल जोशी या व्यासंगी व्यक्तिमत्त्वाने शास्त्रीजींपासून प्रेरणा घेऊन प्राज्ञ पाठशाळेची कामगिरी पुस्तक रूपाने महाराष्ट्रापर्यंत पोहोचवली. प्रख्यात पत्रकार रामभाऊ जोशी यांचे ते नातू आहेत. शास्त्रीजींच्या सोबत त्यांनी काम केले आहे. त्यांच्या अनेक मुलाखती घेतलेल्या आहेत. त्यामुळे शास्त्रीजींच्या कामाची माहिती महाराष्ट्रात पोहोचवण्याचे काम अनिलभाऊंनी मनस्वीपणे केले आहे. महाराष्ट्र त्यांचाही कृतज्ञ आहे.

मी स्वत:ला असा भाग्यवान समजतो की, माझ्या पत्रकारितेच्या ६५ वर्षांत शास्त्रीजींना भेटता आले. यशवंतरावजींकडे शास्त्रीजी यायचे, ग. दी. माडगूळकर यायचे. बाबुराव पारखे यायचे... आणि साहित्याची जी मैफल जमायची अशा मैफली आता होणे नाहीत. ते नेतेही होणे नाहीत.... शास्त्रीजींसारखे विद्वानही नाहीत. यशवंतरावांच्या अनेक राजकीय भूमिकात शास्त्रीजींनी मार्गदर्शकाची भूमिका अतिशय शांतपणे पण निश्चयाने निभावलेली आहे. अनेकांना हे माहिती नसेल की, यशवंतराव विरोधी पक्षनेते म्हणून लोकसभेत असताना त्यांच्या मवाळ भूमिकेबद्दल शास्त्रीजींनी त्यांना सांगितले होते की, 'विरोधी पक्षनेता हा आक्रमकच असायला लागतो.' इंदिरा काँग्रेसच्या प्रवाहापासून यशवंतराव अलग झाले तेव्हा 'तुम्ही स्वगृही गेले पाहिजे,' हा यशवंतरावांना पहिला सल्ला शास्त्रीजींनीच दिला होता. आणि नंतरच यशवंतराव इंदिरा काँग्रेसमध्ये टीका सहन करून दाखल झाले.

'साहित्यिकांच्या संमेलनात शासकीय हस्तक्षेप असावा की नसावा,' 'शासकीय अनुदानावर साहित्य संमेलने व्हावीत की होऊ नयेत' याबद्दलही शास्त्रीजींनी आपली मते ठामपणे मांडलेली होती. १९५२ च्या पुणे येथील साहित्य संमेलनात दुर्गाबाईंच्या भाषणामुळे संमेलनात जो गोंधळ झाला त्यावरचे शास्त्रीजींचे विश्लेषण त्यांच्या व्यापक भूमिकेचे निदर्शक आहे. १९७५ साली कराड येथे झालेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा दुर्गाबाई होत्या. त्यांनीच यशवंतरावांना स्वागताध्यक्षाचे निमंत्रण दिले होते. त्यानंतर २५ जून १९७५ ला आणीबाणी जाहीर झाली. मग दुर्गाबाईंनी भूमिका बदलली. 'यशवंतरावांना व्यासपीठावर येऊ देणार नाही.' यशवंतराव संमेलनाला गेले... स्वागताध्यक्षाचे भाषणही त्यांनी केले. त्यापूर्वी ते पहिल्या रांगेत बसले होते. त्यांच्या शेजारी लक्ष्मणशास्त्री होते. कराडचे नगराध्यक्ष पी. डी. पाटील होते. प्रतापराव भोसले होते. स्वागताध्यक्ष म्हणून भाषण करताना यशवंतरावांनी तेव्हा सांगितले होते की, 'समोर शास्त्रीजी बसलेले आहेत. त्यांना साक्ष ठेवून सांगतो की, या संमेलनाचा स्वागताध्यक्ष म्हणून आमंत्रण स्वीकारताना मी केंद्रीय मंत्री म्हणून आमंत्रण स्वीकारलेले नव्हते. कराडचा नागरिक आणि मराठी साहित्याचा रसिक-वाचक या नात्याने मी संमेलनाला आलो आहे. शिवाय हे संमेलन संगमावर आहे. 'संगम' म्हणजे काय....? इथे कृष्णा नदी कोयना नदीत मिसळते... ती मिसळत असताना आपले 'मी' पण विसरते. आणि कोयना कृष्णेत मिसळते तेव्हा तीही आपले 'मी' पण विसरते. मराठी साहित्यिकांनी आपले 'मी' पण थोडेसे विसरायला शिकले पाहिजे...' स्वागताध्यक्षांच्या भाषणाने संमेलन जिंकले. असा तो अभूतपूर्व प्रसंग पाहण्यास समक्ष शास्त्रीजी समोर होते. त्यांनीच यशवंतरावांच्या भाषणावर पहिली टाळी वाजवली. त्याचे वृत्तसंकलन करायला मीही पत्रकार कक्षात होतो. 'सागर'चे संपादक नाना जोशी हेही होते.

शास्त्रीजी, यशंवतराव, किसन वीर, वसंतदादा असे सातारा जिल्ह्यातील त्यावेळचे राजकारण, साहित्य यातील सर्व दिग्गज महाराष्ट्राचे वैभवच होते. शास्त्रीजींच्या तोडीची आणि कर्तृत्त्वाची माणसे आता होणार नाहीत. पण, त्यांनी उभे केलेले काम त्याच निष्ठेने पुढे नेण्याचा संकल्प महाराष्ट्राने जपला पाहिजे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रींना आयुष्यात किती पुरस्कार मिळाले... त्याची यादी एवढी मोठी आहे की, त्या माणसाचे मोठेपण त्या पुरस्कारामुळे नाही तर पुरस्कारांना शास्त्रीजींमुळे मोठेपणा आला. शास्त्रीजी पद्मविभूषण होते. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. न्यूयॉर्क येथे त्यांचा सत्कार झाला होता. मास्को येथील प्राच्यविद्या धर्म परिषदेला ते भारताचे प्रतिनिधी होते. १९५४ सालच्या दिल्लीतील मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. मुंबई विद्यापीठाने त्यांना एल. एल. डी. पदवी दिली होती. पुण्याच्या भांडारकर प्राच्य विद्या संस्थेचे ते अध्यक्ष होते. फाय फाऊंडेशनचा पुरस्कारही त्यांना मिळालेला होता. आणि हे सर्व पुरस्कार मिळत असताना त्यांनी स्वत:चे ११ ग्रंथ निर्माण केले. आणि विश्वकोषाचे ११ ग्रंथ त्यांनीच निर्माण केले. लोकमान्य टिळक यांनी ज्यांच्या पाठीवर हात ठेवला होता, असे शास्त्रीजी.... शास्त्रीजी यांनी धर्मशास्त्राचा पुरोगामी अर्थ महाराष्ट्रात हिरीरिने मांडला आणि अस्पृश्यतेच्या विरोधात या धर्म पंडिताने धर्मशास्त्राचा आधार दिला. अनेक विधवांना पुन्हा संसारात आणले. आणि त्यालाही धर्मशास्त्राचा आधार दिला. 'सतीची चाल माणुसकीचा घात करणारी आहे.' असे स्पष्ट सांगणाऱ्या पुरोगामी शास्त्रीजींना महाराष्ट्र विसरला तर नाही ना?

⌘⌘⌘

**संपर्क :** ए/३, ७०२, विहंग गार्डन, पोखरण रोड नं १, ठाणे(प.)४००६०६ **भ्रमणध्वनी :** ९८९२०३३४५८

## 'पद्मभूषण' 'महाराष्ट्रकवी' 'बडोदा संस्थानचे राजकवी', रवी किरण मंडळातील नामांकित कवी यशवंत

**प्रतिनिधी, पुणे** – यशवंत दिनकर पेंढारकर यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील समर्थ रामदासस्वामी यांची कर्मभूमी, चाफळ येथे ९ मार्च १८९९ रोजी झाला. समर्थ रामदास आणि शककर्ते छत्रपती शिवाजी महाराज ही त्यांची श्रद्धास्थाने होती व याचा त्यांना अत्यंत अभिमान वाटायचा. लहान वयातच वाई येथील लो. टिळकांचे सहकारी राष्ट्रीय कीर्तनकार डॉ. दत्तोपंत पटवर्धन यांची राष्ट्रवादी वृत्तीचा संस्कार करणारी कीर्तने यशवंतांनी ऐकली होती व त्याचा प्रभावही त्यांचेवर होता. त्यांचे शिक्षण सांगली येथील सिटी हायस्कूलमधून झाले. डिपार्टमेंट स्कूल फायनलच्या परीक्षेत ते उत्तीर्ण झाले.

प्रतिकूल परिस्थितीमुळे पुढचे शिक्षण त्यांना घेता आले नाही. मॅट्रिक झाल्यानंतर पुण्यात लेखनिक म्हणून काम करू लागले. पुण्यात आल्यावर सुरवातीस काव्यरचने संबंधीचे मार्गदर्शन त्यांना कवी साधुदास (गोपाळ गोविंद मुजुमदार) ह्यांचे कडून मिळाले. यशवंतांचा राष्ट्रीय स्वरूपाची कविता लिहिण्याकडे कल होता. त्याच सुमारास पुण्यात रविकिरणमंडळाची स्थापना झाली होती. पुण्यात त्यांना प्रा. श्री. बा. रानडे आणि सौ. मनोरमा श्रीधर रानडे या प्रेमळ दांपत्याने आपल्या कुटुंबातील मानले. सातारा जिल्ह्यातील कवी गिरीश त्यांना मित्र म्हणून लाभले. दोघेही सातारा जिल्ह्यातील त्यामुळे त्यांची मैत्री घट्ट झाली.

रविकिरण मंडळात ते सामील झाले व इंग्रजीतील स्वच्छंदतावादी कवितेचा प्रभाव त्यांच्यावर पडला. यशोधन (१९२९) हा त्यांचा पहिला मोठा आणि लोकप्रिय कवितासंग्रह. त्यानंतरचे त्यांचे 'यशोगंध', 'यशोनिधि', 'यशोगिरी', 'ओजस्विनी' असे अनेक काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. त्यांच्या कवितेमध्ये सामान्यांच्या सुखदु:खांशी निगडीत आशय असल्याने सहाजिकच रविकिरण मंडळात त्यांना सर्वाधिक लोकप्रियता त्यांना मिळाली. त्यांच्या दीर्घ काव्यरचनांमध्ये 'एक प्रेमकथा', 'बंदीशाळा', 'काव्यकिरीट' या कवितांचा समावेश आहे. 'काव्यकिरीट' हे बडोद्याच्या राजपुत्राच्या राज्यारोहणाबाबत खंडकाव्य आहे. 'बंदीशाळा' हे काव्य बालगुन्हेगारांच्या करुणात्मक स्थितीचे चित्रण करणारे खंडकाव्य आहे. तसेच शिवाजी महाराजांच्या जीवनावर त्यांनी 'छत्रपती शिवराय' हे महाकाव्य रचले. पानशेत धरण फुटले त्या दुर्घटनेवर आधारलेले 'मुठे, लोकमाते' हे दीर्घकाव्यही त्यांनी लिहिले.

बालचमुसाठी 'मोतीबाग' हा बालगीतांचा त्यांचा संग्रह आहे. एकत्र कुटुंबपद्धतीतील शाश्वत जीवनमूल्यांचे महत्त्व बरेच ठिकाणी त्यांनी विशद केले आहे. 'प्रीतिसंगम', 'प्रेमाची दौलत', 'चमेलीचे झेले', 'एक कहाणी' अशा कवितांमधून यशवंतांच्या प्रेम कविता साकारल्या.

'गाऊ त्यांची आरती' हे त्यांचे सैनिकांच्या शौर्याला समर्पित गीत गजानन वाटवे यांनी संगीतबद्ध केले होते.

त्यांनी लिहिलेली 'आई' ही कविता माहित नाही असा मराठी माणूस कोठेही सापडणार नाही. या कवितेतील गोडवा आजही कायम राहिला आहे. शामची आई या चित्रपटातील

**आई म्हणोनि कोणी, आईस हाक मारी।।**
**ती हाक येई कानी, मज होय शोककारी।।**
**स्वामी तिन्ही जगांचा आईविना भिकारी।।**

हे वसंत देसाई यांनी संगीतबद्ध केलेले व आशा भोसले यांनी स्वरबद्ध केलेले गीत ऐकल्यावर डोळ्यात पाणी येतेच. 'नीज नीज माझ्या बाळा करू नको चिंता' हे गीतही यशवंतांचेच आहे.

जव्हार संस्थानचे राष्ट्रगीत त्यांनी रचले होते. त्यांना १९४० मध्ये बडोद्यात 'राजकवी' या पदवीने गौरविण्यात आले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर कवी यशवंत यांना 'महाराष्ट्र कवी' म्हणून गौरविण्यात आले. १९५० मधे मुंबईस भरलेल्या तेहतीसाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते.

**महत्त्वाची वैधानिक सूचना** – 'भावे-प्रयोग' या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्याचे सर्व लेखनाधिकार त्या त्या लेखकांकडे आहेत. या अंकातील साहित्य अन्यत्र प्रकाशित करण्यापूर्वी त्या त्या लेखकांकडून पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. – संपादक.

**संपादक मंडळ : अभय शंकर भावे, संपादक**
शशिकिशोर दत्तात्रेय भावे, पर्शराम गोविंद भावे,
उदय नारायण भावे, शिल्पा मंदार भावे. (सल्लागार)

प्राजक्त

'प्राजक्त' हे सायंदैनिक मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांनी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड कोल्हापूर-४१६००२ येथे छापून प्राजक्त कार्यालय, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६००२ येथून प्रसिध्द केले.
**संपादक : प्रफुल्ल डबीर. फोन : 8623053750**
**email** - prajakaweekly@gmail.com
RNI NO. : **M-6 (1457) / 70-RNI**
**Reg. No. KLR 136/24-26 Posted in Kolhapur RMS**